

# जीवन शिक्षण

किंमत रु. ३०
पृष्ठे ४४

जुलै २०२०


ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र










**मा. शिक्षण मंत्री, प्रा. वर्षाताई गायकवाड, यांच्या हस्ते JIO TV वरून शिक्षण विषयक 'ज्ञानगंगा' चॅनलचे उद्घाटन करण्यात आले.**

### JIO TV वरून शिक्षण प्रसारण कसे पहावे?

- JIO TV पाहण्यासाठी JIO मोबाईल क्रमांक व इंटरनेट सुविधा आवश्यक.
- Playstore अथवा MY JIO app वरून JIO TV app डाऊनलोड करावे.
- सदर app वर Login करण्यासाठी आपला JIO मोबाईल क्रमांक व आलेला OTP टाकावा.
- Categories या Option मधून Educational (64) हा Option निवडावा.
- Scroll करीत आल्यास ज्ञानगंगा ३ व ४ थी मराठी, इंग्रजी, उर्दू, ज्ञानगंगा १० वी मराठी, ज्ञानगंगा १० वी English, ज्ञानगंगा १२ वी Science हे channel निवडावेत. यापुढे वाढत जाणारे चॅनेल याठिकाणीच वाढत जातील.

**JIO Saavn Radio Channel :**

सध्या एक Radio Channel LIVE.......

- "We Learn English" हा इंग्रजी शिकण्याचा कार्यक्रम प्रायोगिक तत्वावर सुरू केला आहे.

येत्या काही दिवसात आणखी काही Radio Channel LIVE.......

- गली गली सीम सीम • मराठी गोष्टी • मीना रेडिओ

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

वर्ष ६४ जुलै २०२० अंक ४ था



❖ प्रवर्तक :
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**दिनकर पाटील**
*संचालक तथा संपादक* **अध्यक्ष**

**विकास गरड,** *प्र. प्राचार्य* **सदस्य**

**डॉ. कमलादेवी आवटे,** *प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे.* **सदस्य**

**श्रीम. अश्विनी मुसळे-काळसर्पे**
*सहा. संचालक, लेखा* **सदस्य**

**दत्तात्रय थिटे,** *वरिष्ठ अधिव्याख्याता,* **सदस्य**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**श्रीम. वर्षाराणी भोपळे,** *वरिष्ठ अधिव्याख्याता* **सदस्य**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ **निर्मिती सहायक : डॉ. किरण धांडे**
*वरिष्ठ अधिव्याख्याता, प्रसार माध्यम* **सदस्य-सचिव**

❖ **मुखपृष्ठ व अंतरंग सजावट :**
**नूतन क्षीरसागर,** *आर्टिस्ट कम टेक्निशियन*

❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :** -

❖ **मूल्य : रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/-**


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | - | ४ |
| ❖ स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विचार | विवेक कवठेकर | ५ |
| ❖ द्रष्टे लोकमान्य | रामदास नेहूलकर | ८ |
| ❖ गुरुपौर्णिमा | मीना कुळकर्णी कारंजेकर | ११ |
| ❖ ऑनलाईन शिक्षण आणि ऑनलाईन निकाल | उमेश खोसे | १४ |
| ❖ गरज समुपदेशनाची | डॉ. रत्ना चौधरी | १७ |
| ❖ नवे बदल नवे शिक्षण | डॉ. वैशाली जहागीरदार | २१ |
| ❖ बुद्धिमत्ता भाव | डॉ. संगिता महाजन | २६ |
| ❖ इंग्रजी विषयाच्या शिक्षकांसाठी | डॉ. सुभाष कांबळे | २८ |
| ❖ Multilingualism in English | Harsha Chavan | ३० |
| ❖ इच्छाशक्ती तेथे मार्ग | मंगेश देशपांडे | ३३ |
| ❖ ...आणि मुले प्रेरित झाली | मधुकर येसणे | ३६ |
| ❖ कविता रचू या, कवितेतून शिकू या! | लक्ष्मण नरुटे | ३८ |
| ❖ शिष्यवृत्तीचा सोनाळी पॅटर्न | मारुती देवेकर | ३९ |
| ❖ प्रिय संपादक | - | ४२ |



**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **फॅक्स नं. :** ०२०-२४४७७०९०. **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in



***या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.***

# संपादकीय ....✍



*श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे ।*
*क्षणात येते सर सर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे ।।*

पाठ्यपुस्तकातील बालकवींची ही कविता आठवली की, संपूर्ण श्रावण महिना चित्ररूप घेऊन डोळ्यांसमोर उभा राहतो. हिरव्यागार गालिच्याने नटलेली ही धरती पावसाने न्हाऊन निघालेली असते आणि मग प्रसन्न वातावरणात सुरू होतो ऊन–पावसाचा खेळ. ऊन–पावसाच्या लपाछपीत सूर्यकिरणांनी उधळलेला सप्तरंगांचा इंद्रधनू पाहताना भान हरपून जाते. श्रावणातील पहिला सण नागपंचमी. त्या दिवशी शाळेत पाटीवर नागाचे चित्र काढून केली जाणारी पूजा भूतदयेचा संस्कार करीत होती. गरम गरम लाह्यांचा आस्वाद घेताना मन उल्हसित व्हायचे. भावाबहिणींचे प्रेम दृढ करणारी राखी पौर्णिमाही शाळेत साजरी केली जायची.

पण आज सण–उत्सवाला मर्यादा आल्या आहेत. ऊन–पावसाच्या खेळात ओले होण्याचा आनंद घराच्या आत दारातून आणि खिडकीतून पाहत मर्यादित झाला आहे.

कोविड–१९ मुळे शाळा सुरू झाल्या नाहीत तरीसुद्धा तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आणि शिक्षकांच्या कल्पकतेने सर्वदूर शिक्षण पोहोचावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. टी.व्ही. चॅनल, यू–ट्यूब, दीक्षा ॲप, गुगल क्लास रूम, रेडिओ यांच्या माध्यमांतून सर्वांना शिक्षण मिळेल यासाठी शासन प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी पाठ्यक्रम कमी करण्यात आला आहे. पाठ्यपुस्तके सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहेत. आता गरज आहे शिक्षक, विद्यार्थी व पालक यांनी परस्परांच्या संपर्कात राहण्याची. सध्याच्या असाधारण परिस्थितीत विद्यार्थी आणि पालक यांचे समुपदेशन करून, स्वत:च्या कल्पकतेतून, स्थानिक परिस्थितीनुसार विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव देण्यासाठी विषय मित्र, पियर लर्निंग, ग्रुप लर्निंग, स्वयंसेवक यांच्या मदतीने शिक्षक घरापर्यंत पोहोचण्याची गरज आहे. स्वामी विवेकानंद यांनी म्हटले होते, 'मुले शाळेत येत नसतील तर शिक्षण मुलांपर्यंत पोहोचवा'. हीच वेळ आहे मुलांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याची आणि त्यासाठी शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी प्रयत्नशील राहण्याची. मुलांपर्यंत शिक्षण पोहोचवू या अन् शिक्षणाची प्रक्रिया अखंडित ठेवू या.

**दिनकर पाटील**
संपादक, जीवन शिक्षण

# स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विचार

**विवेक कवठेकर**

भ्रमणध्वनी : ९४२३१३३९३०

*शिष्यात असणाऱ्या बौद्धिक किंवा इतर शक्तींना चालना देणे एवढेच शिक्षकाचे काम नसून त्याचे खरे कार्य आहे शिष्यात 'काही तरी' संक्रमित करणे. प्रत्यक्ष आणि प्रभावाच्या रूपाने गुरूची शक्ती शिष्यात संक्रमित होत असते. शिक्षकाने पैसा किंवा नावलौकिक यांसारख्या अन्य स्वार्थी हेतूने शिकविता कामा नये. त्याच्या कार्याची प्रेरणा साऱ्या मानव जातीबद्दल सात्त्विक आपुलकी हीच असली पाहिजे. स्वामी विवेकानंदांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांच्या शिक्षण विचारांविषयी...*

आपल्या प्रिय मातृभूमीविषयी, भारताविषयी जाणून घ्यायचे असेल तर भारतीय मनीषींचा अभ्यास केल्याशिवाय पर्याय नाही. येथील ऋषीमुनी, महर्षी आणि साधुसंतांनी जीवनाच्या सर्व क्षेत्रांविषयी अगदी बारकाईने चिंतन केले आहे. प्राचीन भारतीय ज्ञान विज्ञानाचा वारसा जपत असतानाच भारत भ्रमण करीत असताना केलेले सूक्ष्म निरीक्षण त्यांना उपयोगी ठरले. या श्रेणीमध्ये केवळ ३९ वर्षांचे आयुष्य लाभलेले स्वामी विवेकानंद महत्त्वाचे ठरतात, ते त्यांनी मांडलेल्या शिक्षणविषयक विचारांमुळे. आज एकविसाव्या शतकात आपण नवी पद्धत म्हणून ज्या ज्ञानरचनावादाची प्रशिक्षणे आयोजित करीत आहोत, त्याची मूळ संकल्पना विवेकानंदांनी केलेल्या शिक्षणाच्या व्याख्येतच दिसून येते.

'शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीच विद्यमान आहे, त्याचे प्रकटीकरण' होय. या विवेकानंदांनी केलेल्या व्याख्येचा आधुनिक अर्थ ज्ञानरचनावाद नाही तर दुसरे काय आहे? ते नेहमी म्हणत असत, 'ज्ञान माणसात अंतर्निहित असते. कोणतेच ज्ञान बाहेरून येत नाही. माणसाला ज्ञान होते म्हणजे अज्ञानाचा पडदा तेवढा बाजूला सरतो. तो बाजूला सरावा यासाठी आपण त्याच्या विकासाच्या मार्गावरील अडथळे दूर करू शकतो.' लखलखणारे ज्ञान हे आतच असते. त्यासाठी ते न्यूटनने लावलेल्या गुरुत्वाकर्षणाच्या शोधाचे उदाहरण देतात. गुरुत्वाकर्षणाचा नियम काय एखाद्या कोपऱ्यात न्यूटनची वाट पाहत बसला होता का? तो होता त्याच्या मनातच. योग्य वेळी त्याची त्याला जाणीव झाली एवढेच. झाडावरून पडणाऱ्या फळाचे निमित्त घडले आणि न्यूटनने आपल्या मनाचा शोध घेतला. मनात आधीपासूनच असलेल्या विचार मालिकांची त्याने फक्त फेरमांडणी केली.

वटवृक्षाचे उदाहरण देताना ते म्हणतात, विशाल वटवृक्ष राईच्या अगदी एक अष्टमांश कणाएवढ्याही नसणाऱ्या अत्यंत लहान बीजात सामावलेला असतो. त्यामुळे बीज केवढे ते महत्त्वाचे नाही, त्याच्यात स्वाभाविकपणे असणारी प्रचंड क्षमता महत्त्वाची. एखाद्या रोपट्याला जसे आपण वाढ म्हटले म्हणून ते वाढत नाही, ते स्वाभाविक वाढीने वाढते तसेच मूल देखील स्वत:च शिकत असते. शिक्षक, पालक हे त्याच्या वाढीस मदत तेवढी करू शकतात. त्यांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे. मुलांकडून अवास्तव अपेक्षा करीत त्यांचे बालपणच हिरावून घेणाऱ्या पालकांनी तर ते अक्षरश: सतत डोळ्यांपुढे ठेवले पाहिजे. विवेकानंद म्हणतात, 'जगात कधीही कोणी कोणाला शिकविले नाही. प्रत्येकाला स्वत:च स्वत:चा गुरु व्हावे लागते. मुलांच्या बाबतीतही तेच. आपण शिकवीत आहोत या कल्पनेने शिक्षक सारे काही बिघडवून टाकतो. बीजाला ज्याप्रमाणे तुम्ही

माती, पाणी, हवा, कुंपण अशी अंकुरण्याला अनुकूल परिस्थिती उपलब्ध करून देता, तेवढेच मुलांच्या विकसनाच्या बाबतीतही केले पाहिजे.'

कोरोना महामारीसोबत लढण्याच्या या काळात अनेक गोष्टी नव्याने आपल्या सर्वांच्याच लक्षात आल्या. मुलांना आपण संस्कृती आणि प्रथांच्या नावाखाली, 'पाय धुवूनच आत या, जेवणाआधी हात धुवा, इतर कोणाचेही कपडे किंवा अन्य वस्तू वापरू नका' अशा ज्या सवयी लावतो त्या आरोग्यदायी आणि आवश्यक असतात. पाल्याच्या अगदी खनपटीला बसून 'हे शिक, ते शिक' असा तगादा लावत दिवसभर क्लासेसला जुंपणाऱ्यांना आपला अट्टाहास किती निरर्थक होता हेही लक्षात आले असेल. असे असले तरी ऑनलाईन, ऑफलाईन कसे का होईना, पण त्याला शिकवा म्हणून आग्रह धरणाऱ्यांनाही शिक्षण म्हणजे नेमके काय ते कळलेले नसते. विवेकानंद म्हणत, 'शिक्षण म्हणजे जन्मात कधी पचनी न पडणारे, डोक्यात निरंतर धुडगूस घालणारे आणि आपल्या मेंदूत ठासून कोंबलेले माहितीचे भेंडोळे नव्हे. आपल्याला आवश्यकता आहे ती जीवन सुसंघटित करणाऱ्या, 'माणूस' घडविणाऱ्या विचारांची. आपल्याला आज अशा शिक्षणाची गरज आहे की ज्याने शील बनते, मानसिक शक्ती वाढते, बुद्धी चौफेर व विशाल होते आणि ज्यायोगे मनुष्य आपल्या पायावर उभा राहू शकतो.'

शिक्षणाने केवळ एखादा युवक स्वत:च्या पायावर उभा राहत नसतो, तर या युवा पिढीच्या बळावर अख्खा देश आत्मनिर्भरतेची स्वप्नं बघत असतो. या देशातून इंग्रजांच्या काळात कच्चा माल बाहेर गेला. नंतरच्या काळात बुद्धिमान तरुण आणि अलीकडे बाजारपेठांतील परकीय वस्तूंच्या माध्यमांतून देशातील पैसा देशाबाहेर गेला. अशा वेळी भारतीय तरुणांनी स्वत:च्या पायावर देश उभा करण्याची गरज आहे. ते प्रत्यक्षात आणायला पुन्हा एकदा विवेकानंदांच्या विचारांकडे वळावे लागेल कारण या आत्मगौरव प्राप्त करून देणाऱ्या विचारांचेही बीज विवेकानंदांच्या शिक्षणविषयक संकल्पनेतच दिसते.

विवेकानंद म्हणत, ''परक्या भाषेत दुसऱ्यांचे विचार रेटून, ते डोक्यात कसे तरी कोंबून आणि त्यांच्या बळावर विद्यापीठाच्या चार-दोन पदव्या मिळवून तुम्ही स्वत:ला सुशिक्षित समजता. हे काय शिक्षण आहे? या साऱ्यांपासून तुम्हांला किंवा देशाला काय लाभ? आपल्याच ज्ञानाच्या विभिन्न शाखांच्या अध्ययनाची आज गरज आहे त्याचबरोबर आधुनिक ज्ञान-विज्ञानाची, ज्याद्वारे उद्योगधंद्यांची वाढ होईल आणि माणूस नोकरीच्या मागे न लागता आपली उपजीविका करू शकेल, असे शिक्षण आत्मसात केले पाहिजे.

**शिक्षणाची पद्धत :** विवेकानंदांनी ज्ञानसाधनेची एकमेव पद्धत म्हणून एकाग्रतेचा उल्लेख केला आहे. उच्चतम योग्यापासून सामान्य माणसापर्यंत सर्वांना ज्ञानप्राप्तीसाठी या एकाच पद्धतीचा अवलंब करायला हवा. प्रयोगशाळेत मूलद्रव्यांवर मनाच्या शक्ती केंद्रित करणारा रसायनशास्त्रज्ञ असो किंवा ग्रहगोलांचा वेध घेणारा खगोलशास्त्रज्ञ, अगदी परमेश्वराची पूजा असो वा गृहिणीचा स्वयंपाक, एकाग्रतेने केले जाणारे प्रत्येक कार्य उत्तम आणि यशस्वी ठरत असते.

एकाग्रतेइतकेच ते श्रद्धेला महत्त्व देतात. 'श्रद्धया लभते ज्ञानम्' या उक्तीप्रमाणे ज्ञानप्राप्तीसाठी श्रद्धा आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची शिक्षकांवर आणि शिक्षकांची विद्यार्थ्यांवर श्रद्धा नसेल तर शिक्षण होणार नाही. 'आपण कोणीच नाही' असा न्यूनगंड बाळगणाऱ्यांकडून खरोखरच काही होणार नाही. मी सर्व काही करू शकतो हा आत्मविश्वास मुलांमध्ये निर्माण झाला पाहिजे. गगनाला गवसणी घालण्याची क्षमता तुझ्यातच आहे, हे स्फुल्लिंग मुलांच्या मनात चेतविणारे शिक्षक विवेकानंदांना अपेक्षित आहेत.

प्राचीन भारतीय प्रमाण विचारांमध्ये 'अनुभव प्रमाण' हे सर्वश्रेष्ठ व विश्वसनीय प्रमाण मानले आहे. तत्त्वसिद्धीसाठी अनुभव प्रमाणाचा आधार घ्यावा लागतो. या न्यायाने विवेकानंदांनी प्रत्यक्ष अनुभवाला प्राधान्य दिले आहे. अनुभवाद्वारे शिक्षण हेच प्रभावी शिक्षण होय असे ते मानतात. शिक्षणाचे उद्दिष्ट जर



१ जुलै : वसंतराव नाईक यांचा जन्मदिन (१९१३)

वर्तन-परिवर्तन असेल, तर त्यासाठी अनुभव घ्यावा व द्यावा लागतो अशीच त्यांची धारणा होती. पदार्थांची चित्रे दाखवून एखाद्याची भूक शमणार नाही तशीच देश बघण्याची इच्छा नकाशा बघून पूर्ण होणार नाही किंवा कित्येक पुस्तके पढवून शल्यचिकित्सक होता येणार नाही म्हणून अनुभव हाच सर्वांत मोठा शिक्षक होय. निसर्गाशी सतत सख्यसंबंध ठेवल्यानेच खरे शिक्षण मिळते हे त्यांचे उद्गार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्यासारख्या निसर्गवाद्याशी मिळते जुळते आहेत.

**व्यक्तिमत्त्व विकास :** शिक्षणाचा हेतू माणसाचे व्यक्तिमत्त्व घडविणे हाच असायला पाहिजे, पण त्याऐवजी आपण बाहेरच्या बाजूलाच रंगरंगोटी करण्यात गढून गेलो आहोत. आपल्या महापुरुषांकडे पाहिले तर त्यांचे व्यक्तिमत्त्वच त्यांच्या प्रभावाचे मुख्य कारण असल्याचे लक्षात येते. त्यांच्यापैकी कदाचित कुणाचे उच्चार व्याकरणशुद्ध नसतीलही, महात्मा गांधींचे हस्ताक्षर फारसे चांगले नव्हते असे ते स्वत:च कबूल करीत, परंतु जनसामान्यांवरील प्रभाव... तो तर आजही कायम आहे. हे व्यक्तिमत्त्व नेमके कशाने विकसित होते? विवेकानंद म्हणत, ''योगशास्त्राच्या नियमांचा आणि पद्धतींचा लक्षपूर्वक अभ्यास करून कोणीही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करू शकतो व ते प्रभावी करू शकतो. गरीब, श्रीमंत, व्यापारी, धार्मिक अशा प्रत्येक माणसाच्या जीवनात प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे अनन्यसाधारण स्थान आहे.

मानवाला पूर्णत्वाची प्राप्ती करून देणे हा या शास्त्राचा उपयोग आहे. यासाठी युगेनयुगे वाट पाहत बसण्याची आवश्यकता नाही. महासागरातील लाटांबरोबर इकडेतिकडे वाहत जाणाऱ्या एखाद्या लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे प्रकृतीच्या हातातील खेळणे बनण्यापेक्षा आपण शक्तिसंपन्न व्हावे, आपल्या विकासाचे कार्य आपल्या स्वत:च्या हाती घ्यावे, ते निसर्गावर सोपवू नये. अखेर या मर्यादित जीवनाच्या पलीकडे जावे ही या शास्त्राची अपेक्षा आहे, हेच या शास्त्राचे उदात्त ध्येय आहे, असे ते म्हणत.

**गुरू-शिष्य संबंध :** गुरुकुल पद्धतीपासून सुरू झालेल्या गुरू-शिष्य या संबंधाने डिजिटल शाळेचा टप्पा गाठताना काळानुरूप आपले आयाम बदलले आहेत. तंत्रज्ञानाच्या या विकास काळात थ्री जी, फोर जी, फाईव्ह जी आले परंतु 'गुरुजी'चे महत्त्व मात्र अबाधित राहिले आहे. आज कोरोना महामारीच्या काळात प्रत्यक्ष शाळा सुरू झालेल्या नाहीत. तेव्हा पर्याय म्हणून काही शाळांनी ऑनलाईन शिक्षण सुरू केले आहे. त्याला मिळणारा प्रतिसाद आणि एकंदरीत अनुभव बघता शिक्षक व विद्यार्थी यांच्यात होणारी प्रत्यक्ष आंतरक्रिया हीच शिक्षणासाठी सर्वोत्तम होय, असा सार्वत्रिक विचार दिसून येतो. विवेकानंद म्हणत, 'गुरुगृहवास ही माझी शिक्षणाची कल्पना आहे. शिक्षक चारित्र्यवान असल्याखेरीज कोणत्याही प्रकारचे शिक्षण होणे शक्य नाही. ज्याचे चारित्र्य ज्वलंत अग्नीप्रमाणे आहे, अशांपाशीच लहानपणापासून रहावे. आपल्या देशात ज्ञानदानाचे कार्य त्यागी लोकांद्वाराच होत आले आहे. ज्ञानदानाचा हा भार अशा त्यागी लोकांनीच पुन्हा एकवार आपल्या शिरावर घ्यावयास हवा. ज्ञान हे इतके पवित्र आहे की, त्याचा विक्रय सर्वथा अयोग्य होय.'

ज्ञान देणाऱ्याला गुरू म्हणा किंवा शिक्षक, त्याच्या अंगी दातृत्व असणे गरजेचे आहे. त्याला शास्त्रांचे मर्म अवगत असावे. जग जर वेद, कुराण किंवा बायबल वाचत असेल तर ते केवळ कोरडे शब्दवाचन ठरता कामा नये. वाक्यरचना, व्युत्पत्तीशास्त्र यांचा शुष्क काथ्याकूट करण्यात, शब्दांचाच कीस पाडण्यात शिक्षक धन्यता मानत असतील तर ते आणि त्यांचे विद्यार्थी खऱ्या मर्मापर्यंत पोहोचू शकणार नाहीत. विवेकानंद म्हणत, 'गुरू अत्यंत पवित्र असेल तरच त्याच्या शब्दाला मोल असते. शिष्यात असणाऱ्या बौद्धिक किंवा इतर शक्तींना चालना देणे एवढेच शिक्षकाचे काम नसून त्याचे खरे कार्य आहे शिष्यात 'काही तरी' संक्रमित करणे.' प्रत्यक्ष आणि प्रभावाच्या रूपाने गुरूची शक्ती शिष्यात संक्रमित होत असते. तिसरी बाब हेतूसंबंधी आहे. शिक्षकाने पैसा किंवा

**(पृष्ठ क्र. १० वर)**

# द्रष्टे लोकमान्य

**रामदास नेहूलकर**
सहसंपादक, केसरी

*थोर व्यक्तींची दृष्टी काळाच्या पलीकडचे पाहत असते, म्हणूनच त्यांचे विचार आजही अभ्यासण्याजोगे असतात. एखादे धोरण राबविताना त्यांचे संदर्भ उपयोगी पडतात. लोकमान्य टिळकांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या शैक्षणिक विचारांचा घेतलेला हा मागोवा.*

स्वराज्याचे उद्गाते, राष्ट्रीयत्वाचे द्रष्टे, गीतेचे भाष्यकार, गणिताचे अभ्यासक, निष्काम कर्मयोगी अशा अनेक गुणदर्शक उपाधी ज्यांच्या नावामागे जोडल्या जातात त्या लोकमान्य टिळकांच्या स्मृतिशताब्दी वर्षाची सांगता एक ऑगस्ट रोजी होत आहे. त्यांच्या निर्वाणाला शंभर वर्षे झाली, तरीही त्यांच्या देशकार्याची, बुद्धी चातुर्याची, संघटन कौशल्याची आणि त्यांच्या विचारांची लोकांच्या मनावर असलेली मोहिनी कमी झालेली नाही. महात्मा गांधींनी त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' म्हणून गौरविले होते. टिळकांनी मांडलेले सर्वच विचार कालातीत आहेत. त्यांच्या विचारांना वास्तवता आणि आधुनिकतेची जोड आहे. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ही लोकमान्यांनी सांगितलेली चतु:सूत्री आणि विचार हा आधुनिक भारताचा पाया आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

राष्ट्रीय शिक्षणाची अत्यंत साधी, सोपी व्याख्या लोकमान्य टिळक करतात, ते म्हणतात ''देशातील सरकार आपल्या प्रजेला जे शिक्षण देते किंवा देऊ इच्छिते ते राष्ट्रीयच असते. देशातील तरुण पिढी देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल, अशा प्रकारचे शिक्षण त्यास देणे हे देशातील विद्या खात्याचे कर्तव्य होय आणि त्यालाच राष्ट्रीय शिक्षण म्हणतात.''

हल्लीचा काळ स्पर्धेचा आहे. आपल्या शेजारचे देश कोणत्या बाबतीत पुढे आहेत किंवा कोणत्या बाबतीत आपल्या राष्ट्राचे महत्त्व कमी करण्यात गुंतले आहेत याचा प्रत्येक विद्या खात्याने विचार केला पाहिजे. त्यानुसार आपल्या देशातील शिक्षणक्रमात सुधारणा केल्या पाहिजेत. शिक्षण म्हणजे नुसते लिहिणे, वाचणे नव्हे. तेवढ्याने भागत नाही. आपल्या देशात कोणते उद्योग होण्यासारखे आहेत त्याचे शिक्षण, ज्ञान देणे आणि जनतेच्या पोटापाण्याची तरतूद करणे हे प्रत्येक सरकारचे कर्तव्य असते. इंग्रज सरकारला भारतातील लोक मोठे इंजिनिअर, वकील, डॉक्टर व्हावेत असे वाटत नव्हते. विलायतेमधून येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करणारे लोक त्यांना हवे होते, असे लोकमान्यांचे मत होते.

राष्ट्रीय शिक्षणातून लोकमान्यांना विद्यार्थ्यांमध्ये स्वाभिमान, स्वभाषा, स्वावलंबन यांचे महत्त्व निर्माण करावयाचे होते.

'हिंदुस्थानातील शिक्षणाची दशा' या अग्रलेखात लोकमान्य टिळक म्हणतात ''देशातील शिक्षण वास्तविक देशातील लोकांची उन्नती होण्यासाठी आहे, जेणेकरून देशातील लोकांचे उद्योगधंद्यांचे ज्ञान वाढून त्यांच्या निर्वाहाची त्याद्वारे सोय होईल, त्यातून नीती व देशाभिमान वाढेल. स्वतंत्र रीतीने, इभ्रतीने दिवस काढता येतील आणि राजकीय व सामाजिक बाबतीत हितकारक कल्पनांचा प्रसार होईल. लोकांना आपली स्थिती सुधारण्यास किंवा सुखकारक करण्यास मार्ग सापडेल. अशा प्रकारचे शिक्षण देशातील सर्व लोकांना मिळणे जरूरीचे आहे. शिक्षणाचा दुसरा मोठा उपयोग म्हणजे; स्वधर्म, स्वदेश याबद्दल शिक्षणाने एक प्रकारची आस्था व कळकळ लोकांच्या मनात निर्माण झाली पाहिजे.



२ जुलै : कल्पक्कम, तमिळनाडू येथे अणुऊर्जा केंद्राची स्थापना (१९८३)

राष्ट्रातील पुरुष, स्त्रिया, मुले अधिकाधिक ज्ञानसंपन्न होऊन राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक दृष्ट्या राष्ट्राची एकजुटीने उन्नती करण्यास प्रवृत्त होतील ते खरे शिक्षण होय.'' (अग्रलेख ऑक्टोबर १८८१)

लोकमान्यांनी ज्ञान किंवा शहाणपणाचा महिमा वेळोवेळी स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, ''शहाणपणाच्या मागे सर्व गोष्टी येतात. लोक शहाणे होऊ लागले व त्यांना आपले हित, अहित कळू लागले म्हणजे त्यांना धैर्य येते, कल्पना सुचते, संपत्ती मिळते व अखेरीस स्वातंत्र्य मिळते. सर्व मोठेपणाचा पाया शहाणपण आहे. तरी देखील पाश्चात्त्य विद्यांचा पुरस्कारही त्यांनी केला आहे. मात्र त्यांच्या दृष्टीने मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व अमूल्य आहे.'' मातृभाषेतून शिक्षण ही नैसर्गिक गोष्ट आहे. मात्र दुर्दैवाने इंग्रजी म्हणजे यशाचा राजमार्ग, इंग्रजी बोलणारे तेवढे हुशार असा न्यूनगंड पोसला जात आहे. इंग्रजीचे ज्ञान आवश्यक असले तरी शिक्षणात मायबोलीचा वापर करावा, संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे व्यवहार्य नाही हेच लोकमान्यांनी स्पष्ट केले आहे.

टिळकांनी धंदे शिक्षणाला कृषी शिक्षणाची जोड दिली. शेतीप्रधान देशात ज्या ८० टक्के लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे, तिथे उपलब्ध जमिनीत चांगले व अधिक धान्य कसे पिकविता येईल, यावर संशोधन झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. संकरित बियाणे, शेतमाल प्रक्रिया, आधुनिक शेती यांचा ऊहापोह त्यांनी आपल्या लेखातून केला आहे. टीचभर जमिनीत पिकांची लागवड करून शेतकरी आपला उदरनिर्वाह करू शकेल, असे शिक्षण त्याला मिळाले पाहिजे, असे त्यांचे मत होते.

सरकारने कृषी शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. हाती असेल तेवढ्या जमिनीत चांगले व पुष्कळ अन्नधान्य कसे पिकवावे हा कृषी शिक्षणाचा मुख्य हेतू आहे. धंदे शिक्षणाचा हेतू देशातील उद्योग धंदे वाढविणे हा आहे. कृषी शिक्षण हे सर्वसामान्य जनतेसाठी आम्ही मागत आहोत असे टिळकांनी एका ठिकाणी म्हटले आहे. औद्योगिक आणि धंदे शिक्षणाचा त्यांनी आग्रह धरला होता. विशेष शाळांमधून कृषी विषयक शिक्षण मिळाले पाहिजे. भारतात कोणत्या वस्तू निर्माण केल्या पाहिजेत व परदेशी वस्तूंवर आपल्याला अवलंबून राहावे लागू नये हा दृष्टिकोन त्यांनी २० सप्टेंबर १९४८ रोजी केसरीत लिहिलेल्या अग्रलेखातून मांडला होता.

राष्ट्रीय शिक्षणाचा विचार त्यांनी मांडला. राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या पाहिजेत. लोकांनी नि:स्वार्थपणे शैक्षणिक प्रवाहात सामील व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

२०१९ च्या नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात लोकमान्य टिळकांच्या धंदे शिक्षण आणि शेती शिक्षणासंबंधीच्या विचारांचे प्रतिबिंब स्पष्टपणे उमटलेले दिसते. या धोरणात शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे अशा सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षणाचा अंतर्भाव करण्यात आला असून येत्या पाच वर्षांत, शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५० टक्के विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यानुसार पुढील दशकभरात व्यावसायिक शिक्षण हे सर्व संस्थांमध्ये टप्प्याटप्प्याने समाविष्ट करण्यात येणार आहे. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण हे उदारमतवादी शिक्षणाच्या व्यापक दृष्टिकोनाचा भाग असणार आहे. दोन हजार तीस ते पस्तीसपर्यंत पदवीपूर्व स्तरातील व्यावसायिक शिक्षण एकूण विद्यार्थी प्रवेशाच्या ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. याच शैक्षणिक धोरणानुसार सर्व भारतीय भाषांचे संवर्धन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. आदिवासी भाषेसह सर्व भारतीय भाषांचा योग्य सन्मान केला जाईल तेव्हाच देशात प्रत्येक प्रदेशातील संस्कृतीचे व परंपरांचे खऱ्या अर्थाने संवर्धन होणार आहे आणि सर्व विद्यार्थ्यांना याचे आकलन होणे सर्वार्थाने साध्य होणार आहे, असेही या धोरणात नमूद करण्यात आले आहे. मातृभाषेतून शिक्षण देण्यामागे लोकमान्यांना जो विचार अभिप्रेत होता, तोच या राष्ट्रीय शिक्षणातून, या धोरणातून प्रतिबिंबित झाला आहे.

◈◈◈

(पृष्ठ क्र. ७ वरून)

नावलौकिक यांसारख्या अन्य स्वार्थी हेतूने शिकविता कामा नये. त्याच्या कार्याची प्रेरणा साऱ्या मानवजातीबद्दल सात्त्विक आपुलकी हीच असली पाहिजे.

शिष्य म्हणजे ज्ञान ग्रहण करणारा, हा देखील 'सत्पात्र' असावयास हवा. याचा अर्थ, शिष्य किंवा विद्यार्थ्याकडे ज्ञानोपासनेची खरी तृष्णा व चिकाटी हे गुण गरजेचे आहेत. त्याचप्रमाणे शिक्षकाप्रती श्रद्धाभाव असणे अतिशय आवश्यक आहे. ज्याप्रमाणे रुग्णाचा डॉक्टरवर विश्वास नसेल तर त्याने सुचविलेल्या औषधाने गुण येऊ शकत नाही तसेच हे आहे. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील परस्पर संवाद, विश्वास, आपुलकी ही बाब शिक्षकांच्या विद्वत्तेइतकीच महत्त्वाची ठरत असते. स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत असणारे शिक्षण हीच काळाची गरज ठरणार आहे.

◈◈◈

## निवेदन

आज राज्यात कोरोनामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले असून शाळा सुद्धा बंद आहेत. आपल्याला माहीत आहे की, शाळा बंद असल्या तरी विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये म्हणून शालेय शिक्षण विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत देखील दररोज विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी तंत्रज्ञानाच्या मदतीने आणि टी.व्ही. व रेडीओद्वारे देखील शिक्षण सुरू करण्यात आले आहे.

अर्थात शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या संवादाची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही हे ही खरे. शिकण्याची व शिकविण्याची प्रक्रिया आत्मीयतेतूनच प्रभावीपणे घडून येत असते. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये म्हणून विविध माध्यमांतून प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या या प्रयत्नाचा प्रवास सर्व महाराष्ट्राला माहीत होणे आवश्यक आहे. आपल्या जिल्ह्यातील या प्रकारचे काम करणाऱ्या शिक्षकांचे/पर्यवेक्षकीय यंत्रणेचे काम SCERT पर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपणावर सोपवीत आहोत, जेणेकरून 'जीवन शिक्षण'मधून त्याला योग्य ती प्रसिद्धी देता येईल. हे लेख १० ऑगस्ट पर्यंत पाठवावेत.

या शिवाय आपण आपल्या जिल्ह्यात शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने राबवीत असलेले नावीन्यपूर्ण उपक्रम, २१ व्या शतकातील विविधांगी कौशल्यांशी संबंधित लेख, जागतिक पातळीवर शैक्षणिक दृष्टीने होणारे बदल व त्यांचे परिणाम, इतर राज्यांतील, देशांतील best practices, इत्यादींबाबतचे लेख 'जीवन शिक्षण'च्या अंकासाठी आपणाकडून अपेक्षित आहेत. जेणेकरून महाराष्ट्राच्या शिक्षण विभागाचा आरसा असणारे हे मासिक अधिक दर्जेदार होईल व या माध्यमातून सर्वांना मुलांच्या शिक्षणाविषयी दिशा मिळेल. उपरोक्त विषयाचे साहित्य खालील e-mail वर पाठविण्यात यावे.

Jeevanshikshan123@gmail.com अथवा jeevanshikshan@maa.ac.in

१) लेख पाठविताना ते युनिकोड फॉन्टमध्ये असावेत.

२) लेखाची शब्दमर्यादा सुमारे १००० शब्द.

३) लेखाची उद्दिष्टे आणि परिणाम स्पष्ट असावेत.

४) लेखाला अनुसरून उत्तम दर्जाचे दोन/तीन फोटो पाठवावेत.

**दिनकर पाटील (संचालक)**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



**३ जुलै : भारतात कायद्याचे अध्यासन सुरू (१८५५)**

# गुरुपौर्णिमा

**मीना कुळकर्णी कारंजेकर**
भ्रमणध्वनी : ९८५०३०८५६६

*आपल्या आयुष्यात आपल्याला ज्ञानरूपी वसा देणाऱ्या, आईसारखी माया करणाऱ्या, पाठीवर शाबासकीची थाप देणाऱ्या, चुकते पाऊल सावरणाऱ्या, प्रसंगी आधारवड बनणाऱ्या मार्गदर्शक, दिशादर्शक गुरूंचे स्थान फार महत्त्वाचे असते. आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणावर ज्यांना गुरू मानावे अशा अनेक व्यक्ती आपल्याला भेटतात, सगळ्याच गुरूंचे ऋण मानत, गुरुपौर्णिमेला त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताना एकूणच गुरूपरंपरेविषयी विचार मांडणारा हा लेख.*

कोणतीही संस्कृती ही संस्कार आणि परंपरा यांच्यामुळे टिकत असते, वर्धिष्णू होत असते. परंपरा म्हणजे कधीही न आटणारा, सतत पुढे पुढे जाणारा वाहता झरा. संस्कारांची रुजवात करणारा. हे संस्कार एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित होत असतात.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, नैतिक आणि साहित्य-कला, ज्ञान-विज्ञान, तत्त्वज्ञान विषयक घटकांची जी समाज स्थिती असते ती म्हणजे संस्कृती. लोकजीवनातील दैनंदिन व्यवहारातून, वागण्याबोलण्यातून संस्कृतीचे दर्शन घडत असते.

लोकजीवनातील प्रमुख अंग असते परंपरेने चालत आलेले सण, उत्सव आणि दिनविशेष. जुन्या पिढीची नाळ नव्या पिढीशी जोडण्याचे व त्यातून संस्कार करण्याचे काम या सण, उत्सव, दिन-विशेषांद्वारे होत असते. त्यातूनच अनेक जीवनोपयोगी कौशल्यांचा विकासही होत असतो. घराची स्वच्छता करणे, घराची सजावट करणे, रांगोळी काढणे, वेगवेगळे पदार्थ बनविणे, सर्वांसोबत आनंद घेणे, विविध कलागुणांची अभिव्यक्ती करणे अशा कितीतरी गोष्टी अनौपचारिकरीत्या शिकल्या जात असतात.

आषाढ महिन्यात शुक्ल पक्षात येणारी पौर्णिमा ही 'गुरुपौर्णिमा' म्हणून ओळखली जाते. तिलाच 'व्यासपौर्णिमा' असेही म्हणतात. महाभारताचे रचयिता महर्षी व्यास यांचा जन्म दिवस म्हणून या दिवसाचे विशेष महत्त्व कारण व्यास हे आदिगुरू मानले जातात. त्यांच्यापासून ज्ञानाचा उगम झाला. वेद, पुराणांची निर्मिती त्यांनी केली म्हणून 'वेदव्यास' या नावानेही ते परिचित आहेत. त्यांच्याप्रति आदर, श्रद्धा व्यक्त करण्यासाठी शिक्षणक्षेत्रात, संगीतादी कलाक्षेत्रात आणि आध्यात्मिक क्षेत्रात गुरुपौर्णिमेला फार महत्त्वाचे स्थान आहे. अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश गुरू दाखवीत असतात. आपल्या आयुष्याला योग्य वळण लागावे, आपल्या जगण्याला अर्थ मिळावा म्हणून गुरूंचे मार्गदर्शन फार मोलाचे ठरते. आपल्या गुरुंप्रति आदर व्यक्त करण्यासाठी, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'गुरुपौर्णिमा' महत्त्वाची असते.

मूल जन्माला येते त्यावेळी ते पूर्णपणे परावलंबी असते. केवळ शी-शू, रडणे, झोपणे या नैसर्गिक क्रिया ते करीत असते. त्याला हळूहळू आई एक एक गोष्ट शिकविते. त्यामुळे मुलाचा पहिला गुरू माता असते. 'मातृ देवो भव' हे यासाठीच म्हटले जाते. कुटुंबात इतरही माणसे असतात त्यांचे अनुकरण करून, निरीक्षण करून मूल शिकत असते. प्रत्येक गोष्ट स्वतः करावी ही बालसुलभ वृत्ती असते. त्यामुळे शाळेत जाण्यापूर्वी

ते बऱ्यापैकी स्वावलंबी बनलेले असते, भाषा कौशल्यही विकसित होत असते म्हणून कुटुंब ही त्याची अनौपचारिक शाळाच असते आणि कुटुंबातील आई व्यतिरिक्त अन्य नातेवाईकही त्याचे 'गुरू'च असतात.

आपल्या देशात गुरू-शिष्य परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. पतंजलीच्या योगसूत्राने ईश्वराला परमगुरू असे म्हटले आहे. त्या काळी गुरुकुल पद्धती होती. विद्यार्जनासाठी विद्यार्थी गुरूंकडे जात. गुरूंच्या सान्निध्यात राहून विद्यार्जन करीत. निसर्गाच्या सहवासात, एखाद्या साध्या आश्रमामध्ये विद्याध्ययन चाले. शरीर श्रमही करावे लागत. जंगलातून सरपण गोळा करून आणणे, कंदमुळे आणणे, नदीवर जाऊन पाणी घेऊन येणे इत्यादी कामे सर्वांनाच करावी लागत. राजपुत्र आणि गरीब दरिद्री मुलगा एकत्रच राहून विद्याग्रहण करीत असत. 'शिक्षक' या शब्दाला संस्कृतमध्ये 'आचार्य' हा शब्द वापरला जातो. त्याचा अर्थ असा होतो की, ज्याने सर्व विषयांचे अध्ययन केले आहे, जो स्वतः सर्व नीतीनियमांचे पालन करतो आणि आपल्या शिष्यांकडूनही करून घेतो तो आचार्य. शील, प्रज्ञा आणि करुणा यांनी युक्त तो आचार्य! अशा आचार्यांच्या सहवासात बारा वर्षे राहून शिष्य स्वगृही परतत असत त्यावेळी आचार्य त्यांना सांगायचे की, 'मी तुम्हांला विद्या दिली परंतु तुम्ही मला प्रमाण मानू नका, सत्यालाच प्रमाण माना.'

आपला शिष्य स्वतंत्र बुद्धीने स्वयं निर्णय घेऊ शकेल. सत्य असत्याची पारख करू शकेल हा विश्वास आचार्यांना असायचा. राम, कृष्ण, कौरव-पांडव हे सर्वजण गुरुकुल परंपरेतूनच घडले. गार्गी आणि मैत्रेयी या विदुषी याच कालखंडातील आहेत, पण हळूहळू ही परंपरा लोप पावत गेली.

पुढे लोकसंख्या वाढू लागली. मानवी समाज झपाट्याने बदलत होता. विविध विचार प्रवाह निर्माण होत होते. हळूहळू नगरं वसू लागली होती. त्याचा परिणाम शिक्षण पद्धतीवरही होत होता. जिज्ञासा ही मानवाची मूलभूत भावना आहे. आपल्या अवतीभोवती असणाऱ्या गोष्टींचा अर्थ समजून घेणे, त्याबद्दल परस्परांशी चर्चा करणे हे ही एक प्रकारचे शिक्षणच असते आणि मनात प्रश्न निर्माण होतात. त्यावेळी उत्तराचा शोध घेण्याची म्हणेजच शिकण्याची ऊर्मी निर्माण होते. अशा वेळी गुरूची गरज भासते. गुरुकुल पद्धती जरी हळूहळू कालबाह्य ठरली तरी गुरू-शिष्य परंपरा मात्र कधीच खंडित होणार नाही!

भारतीय शिक्षणक्षेत्रात फार मोठी क्रांती घडली ती इ. पू. सहाव्या शतकात! त्यावेळी वंशभेद, वर्णभेद, जातीभेद यांचे प्राबल्य फार वाढले होते. कर्मकांड, पशू हत्या यांमुळे समाजामधील शांती नष्ट झाली होती. त्यावेळी गौतमबुद्धांनी प्रेम, अहिंसा, दया, क्षमा या मूल्यांचा प्रचार-प्रसार केला. सत्कर्मावर भर देण्याचा उपदेश त्यांनी केला. सर्वसामान्य लोकांना तो पटला. अनेकांनी गौतमबुद्धांचे शिष्यत्व पत्करले. बौद्ध तत्त्वज्ञान ही ज्ञानाची नवी शाखा सुरू झाली. मठ, विहारांमधून बौद्ध भिक्खू ज्ञान प्राप्त करू लागले. शिक्षणाची किंमत ज्यांना कळली ते या विचारधारेकडे आकृष्ट झाले. शारीरिक, मानसिक, नैतिक, बौद्धिक विकासावर आधारित शिक्षण सर्वांसाठी खुले झाले. पुढे याच तत्त्वज्ञानावर आधारित नालंदा विश्वविद्यालय स्थापन झाले. बुद्धिनिष्ठ, अनुभवनिष्ठ आणि प्रयत्नवादावर आधारलेली शिक्षणपद्धती आणि मानवतावादाला दिलेले महत्त्वाचे स्थान यांमुळे या ठिकाणी संपूर्ण आशिया खंडातून विद्यार्थी शिकण्यासाठी येत होते. त्यावेळी नालंदा येथील ग्रंथालय हे जगातील सर्वांत मोठे ग्रंथालय मानले जात होते.

गुरू आणि शिष्यांचे अत्यंत सुंदर नाते या ठिकाणी निर्माण झाले होते कारण मौखिक परंपरेनेच अधिकाधिक अध्यापन करावे लागे. मन एकाग्र करून अध्यापकाचा



४ जुलै : मादाम मेरी क्युरी स्मृतिदिन (१९३४)

शब्द न् शब्द ऐकावा लागे. तो स्मरणात ठेवावा लागे. या शिक्षण केंद्रात प्रश्नोत्तरे, परस्पर संवाद व संभाषण यांद्वारे चालणारे अध्ययन-अध्यापन अत्यंत यशस्वी ठरले होते. शिक्षकांच्या साध्या राहणीचा, तत्त्वनिष्ठ विचारसरणीचा आणि ज्ञानाचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत होता.

नालंदा विश्व विद्यालयाप्रमाणेच तक्षशिला आणि विक्रमशिला शिक्षण केंद्रांनीही शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे योगदान दिले आहे म्हणूनच हा कालखंड 'भारतीय इतिहासातील सुवर्णयुग' म्हणून ओळखला जातो.

शिक्षणाच्या निमित्ताने देश-विदेशातील लोक जसे जसे भारतात येऊ लागले तसे तसे भारताच्या समृद्धीने दिपून जाऊन विदेशातील व्यापारी भारतात येऊ लागले. काहींना भारतावर आपली सत्ता स्थापन करायची होती. त्यामुळे आठव्या शतकापासून मुस्लिमांचे आक्रमण भारतावर सुरू झाले. अनेक परदेशी राज्यकर्ते येत गेले. त्यामुळे त्यांची संस्कृती, सभ्यता आपल्या देशात रूढ होत गेली. काही परंपरा आल्या. तसेच तत्त्वज्ञान, कला, ज्ञान-विज्ञान यांचीही देवाणघेवाण परस्परांमध्ये होत राहिली.

सोळाव्या शतकात आधी बाबर आणि नंतर अकबर यांनी शिक्षणक्षेत्रात खूप सुधारणा केल्या. अनेक प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू केल्या. बाबर स्वतः साहित्याची, अभ्यासाची आवड असणारा राज्यकर्ता असल्यामुळे विद्या प्रसाराचे मोठे काम त्या कालखंडात घडले. अकबरानेही गणित, भूगोल, इतिहास, कृषिविज्ञान, खगोलशास्त्र हे विषय अभ्यासक्रमात आणले. शिक्षणाचा प्रसार संपूर्ण देशभर झाला. या काळात वाचनालयांची संख्या वाढली. लेखन, वाचन या कौशल्यांना प्रोत्साहन मिळाले. मुख्य म्हणजे उत्तम चारित्र्यावर भर देणारे, तत्त्वनिष्ठ, उच्चशिक्षित शिक्षक त्या काळात होते. ते पित्याप्रमाणे विद्यार्थ्यांना जपायचे. योग्य ते मार्गदर्शन करायचे. त्यामुळे गुरू-शिष्य यांचे नाते अतिशय निरोगी आणि उत्तम होते. गुरूंचा मान सर्वच विद्यार्थी मनापासून ठेवीत होते.

ब्रिटीशांनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात पाऊल ठेवले आणि ही समृद्ध, सुजलाम्, सुफलाम् भूमी पाहून ते येथे घट्ट रोवले! त्यांनी दीडशे वर्षे भारतावर राज्य केले. मुत्सद्दीपणाने, धोरणीपणाने त्यांनी आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात हस्तक्षेप केला. इंग्लंडमधून सत्ता चालविण्यासाठी भारतातच इंग्रजी जाणणारी माणसे त्यांना हवी होती. त्यासाठी त्यांनी भारतातील उच्च आणि मध्यमवर्गीयांसाठी शाळा सुरू केल्या. तत्पूर्वी हिंदूंच्या पाठशाळा, 'गुरुकुलं' होती आणि मुस्लिमांचे 'मदरसे' होते. इंग्रजांनी मिशनरी शाळा सुरु केल्या. त्यांचे राज्य चालविण्यासाठी मदत करणारे, इंग्रजी जाणणारे लोक तयार झाले आणि भारतीयांची मानसिक गुलामी टिकून रहावी म्हणून इंग्रजांची संस्कृती किती थोर आहे हे भारतीयांच्या मनावर बिंबविता आले!

अर्थात ब्रिटिशांमुळे संपूर्ण भारतभर शिक्षणाचा प्रचार-प्रसार झाला हे निश्चित. शिवाय विज्ञान, तंत्रज्ञान हे विषय औद्योगिक विकासासाठी फार आवश्यक होते, ते अभ्यासक्रमात आले. त्याचा फायदा भारतीयांना झालाच. इंग्रजांनी खूप प्राथमिक व माध्यमिक शाळा काढल्या त्यामुळे शिक्षणाबाबत लोकांमध्ये जाणीव निर्माण झाली. स्त्री शिक्षणासाठी अत्यंत प्रतिकूल वातावरण असतानाही महात्मा जोतिबा फुले यांनी आपल्या पत्नीला, सावित्रीबाईंना स्वतः शिकविले आणि त्या भारतातील पहिली स्त्री शिक्षिका बनल्या.

शिक्षकांची आवश्यकता प्रत्येक कालखंडात कायमच राहिली! अनेक राजसत्ता बदलल्या. सामाजिक बदलही खूप झाले, पण गुरुंचे स्थान शिक्षणक्षेत्रात अबाधितच राहिले. गुरु म्हणजे 'साक्षात परब्रम्ह' कारण ब्रम्हा, विष्णू आणि महेश या देवत्रयींचे कार्य जे उत्पत्ती, स्थिती

**(पृष्ठ क्र. २० वर)**

# ऑनलाईन शिक्षण आणि ऑनलाईन निकाल

**उमेश खोसे**

जि. प. प्रा. शाळा जगदंबानगर, कडदोरा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद ◆ भ्रमणध्वनी : ७९७२९५९६८६

*कोणताही बदल हळूहळू पचवणं माणसाला शक्य होतं, पण अनपेक्षितपणे एखादा बदल स्वीकारणं अनिवार्य झालं की तो गोंधळून जातो. आजच्या कोरोनाच्या, लॉकडाऊनच्या काळात शिक्षणप्रक्रियेतील बदलांनी असेच काहीसे झाले आहे. अर्थात हळूहळू ही ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया अंगवळणी पडणार आहे. खेड्यातील एक शाळा 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' यात कशी यशस्वी झाली आहे याविषयी...*

सध्या कोरोना व्हायरसने जगभरात धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे देशात सर्वत्र लॉकडाऊन आहे. याला अपवाद शाळाही राहिल्या नाहीत. त्यामुळे सर्व शाळा बंद असून विद्यार्थी घरातच आहेत. शासनाला द्वितीय सत्राच्या परीक्षा सुद्धा रद्द कराव्या लागल्या होत्या. यामुळे नक्कीच शिक्षक व विद्यार्थ्यांचा संपर्क तुटला आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात ठेवणे कठीण आहे. अजून किती दिवस आपण मुलांचे प्रत्यक्ष शिक्षण सुरू करू शकत नाही याचा अंदाज लावणे अवघड आहे. यातच महाराष्ट्रातील काही शिक्षक बांधव विद्यार्थ्यांशी संपर्क करण्यासाठी धडपडत आहेत. प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन संपर्क कसा साधता येईल, यासाठी उपलब्ध असणाऱ्या सर्व पर्यायांचा वापर करीत आहेत. ते मुलांशी नाळ जोडून आहेत. सर्वच शिक्षक प्रयत्नशील असून त्यांचे प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. बऱ्याच शिक्षक बांधवांनी व्हॉट्सअॅप ग्रुप बनवून मार्गदर्शन सुरू केले आहे. तसेच काही बांधव व्हर्च्युअली संपर्क साधत आहेत. काहीजण आपले कोरोना साहाय्यता कक्षातील कर्तव्य बजावताना मुलांशी संपर्क साधत आहेत. यासाठी शासन व प्रशासनाच्या वतीनेही सातत्याने प्रयत्न चालू आहेत. यात मा. शिक्षणमंत्री प्रा. वर्षाताई गायकवाड यांच्या प्रेरणेने मा. संचालक दिनकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' हे दररोज सुरू असलेले सदर सर्वांसाठी उपयुक्त आहे. यामुळे महाराष्ट्रातील वाड्या–वस्त्यांवर काम करणारे शिक्षक व विद्यार्थी यांना अभ्यास कसा करावा, त्याची माहिती कोठे उपलब्ध होईल याची लिंकसहित माहिती या सदरात असते. यासाठी मैलाचा दगड ठरले आहे 'दीक्षा अॅप'.

## जगदंबानगर शाळेने लावला ऑनलाइन निकाल

**उमरगा, ता. २ (बातमीदार)** : तालुक्यातील कडदोरा येथील जगदंबानगरमधील जिल्हा परिषद शाळेने २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाचा निकाल महाराष्ट्र दिनादिवशीच ऑनलाइन लावल्याने पालकांना आपल्या मुलांची शैक्षणिक प्रगती कळू शकली.

कोरोनाने थैमान घातल्याने शाळा बंद असून, द्वितीय सत्र परीक्षासुद्धा रद्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त शाळेत होणारे ध्वजवंदन कार्यक्रमही रद्द करण्यात आले आहेत. अशात मुलांना प्रत्यक्ष निकाल देणे शक्य होणार नाही म्हणून शाळेतील उपक्रमशील शिक्षक उमेश रघुनाथ खोसे यांनी स्वतः शाळेची वेबसाईट बनवून ऑनलाइन निकाल जाहीर केला आहे. ऑनलाइन पद्धतीने निकाल लावणारी ही जिल्ह्यातील एकमेव जिल्हा परिषद शाळा ठरली आहे.

'शाळेला गावाचा आधार व गावाला शाळेचा अभिमान' या वेबसाईटचे उद्घाटन उस्मानाबाद डायटचे प्राचार्य डॉ. इब्राहिम नदाफ, शिक्षणाधिकारी शिवाजी जाधव, उपशिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार, गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, अधिव्याख्याता नारायण मुदगलवाड, विषयतज्ज्ञ समाधान शिकेतोड, तानाजी खंडागळे, केंद्रप्रमुख नंदकुमार चौधरी, शीला मुदगडे यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रदिनी सकाळी दहा वाजता मान्यवरांच्या हस्ते ऑनलाइन बैठकीतच व्हिडिओ शेअर करून व वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सर्वांनी शाळेचे मुख्याध्यापक श्रीराम पुजारी व तंत्रस्नेही शिक्षक उमेश खोसे यांचे हा उपक्रम राबविल्याबद्दल कौतुक केले.

वेबसाईटवर शाळेत राबवीत असलेले उपक्रम; तसेच विद्यार्थी व पालकांसाठी उपयुक्त माहिती देण्यात आली आहे. ऑनलाइन प्रवेशपात्र विद्यार्थी माहिती संकलन व प्रवेश देण्याचे काम चालू करण्यात आलेले



उमरगा : ऑनलाइन बैठकीत सहभागी अधिकारी (दुसऱ्या छायाचित्र) ऑनलाइन गुणपत्रिका.



आहे. तसेच ऑनलाइन शिक्षणासाठी उपयुक्त माहिती या वेबसाईटवर उपलब्ध आहे. www. zppsjagdambanagar. blogspot.com या वेबसाईटवर लिंक उपलब्ध केल्याचे श्री. खोसे यांनी सांगितले. जिल्ह्यात शाळेचा नावलौकिक उपक्रमशील शाळा म्हणून होत आहे.

अशाच प्रकारे उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील जगदंबानगर, कडदोरा येथे मी लॉकडाऊन सुरू झाल्यानंतर मुलांशी संपर्क कसा साधावा, त्यांचा अभ्यास कसा घ्यावा याचा विचार करीत होतो. अशातच शाळांना जरी सुट्ट्या असल्या तरी शिक्षक ग्रामपंचायत स्तरावर कोरोना सहाय्यता कक्षात कार्यरत आहेत. कोरोनाबद्दल जनजागृती करीत असताना झूम या ॲपची माहिती दिली. माझ्या शाळेतील मुले पहिल्यापासूनच शाळा सुरू असतानाही दीक्षा ॲपचा नियमित वापर करतात. मी दररोज सकाळी नऊ वाजता व्हॉट्सॲप ग्रुपवर व साध्या टेक्स्ट मेसेजद्वारे दररोजचा अभ्यास पाठविणार. मुलांनी तो करायचा. जे घटक समजणार नाहीत त्यांचा अभ्यास दीक्षा ॲपद्वारे करायचा. दिवसभर केलेल्या अभ्यासाचे फोटो व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठवायचे असे मी पालकांना सांगितले. अशीही माहिती दिली. पालक व विद्यार्थी यांनी यास संमती दर्शविली. शाळेत एकूण पटसंख्या २६. त्यांपैकी १८ मुलांच्या पालकांकडे अँड्रॉइड मोबाईल होता. उर्वरित ८ पालकांकडे किंवा विद्यार्थ्यांच्या भावांकडे, चुलत्यांकडे साधा मोबाईल होता.

सध्या शासन व प्रशासनाच्या वतीने प्रत्यक्ष बैठका आयोजित न करता व्हर्च्युअल मीटिंग घेतल्या जात आहेत. याचाच अवलंब करीत मी शाळेतील ज्यांच्याकडे अँड्रॉइड मोबाईल होता, त्याचाच आधार घेत झूम ॲप द्वारे रोज ४० मिनिटांचे दोन सेशन घेत ऑनलाईन मार्गदर्शन सुरू केले. मुले नियमित दीक्षा ॲपचा वापर करू लागली. तसेच यावेळी मी अभ्यासाचा आढावा घेऊ लागलो. हळूहळू पालकांत जागृती झाली व सर्व पालक आपल्या पाल्यांसाठी वेळ देऊ लागले. या गावातील बहुतांश पालक शेतकरी असल्याने ऑनलाईन तासाची वेळ सायंकाळी ७ ठेवली कारण तोपर्यंत शेतातील काम आटपून पालक घरी येतात. आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी ते स्वतः




ॲप वापरायला शिकले. मुलांना मीटिंग जॉईन करून देऊ लागले. आजही करीत आहेत. विद्यार्थ्यांबरोबर पालकही या ऑनलाईन तासिकेच्या वेळी हजर असतात.

दररोज सकाळी ९ वाजता मी जगदंबानगर कडदोरा नावाच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर व साध्या टेक्स्ट मेसेजवर अभ्यास पाठवितो. तसेच 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' हा मेसेजही पाठवितो. मी स्वत: बनविलेल्या ऑनलाईन टेस्ट दर शनिवार व रविवारी पाठवितो. मुले त्या टेस्ट सोडवून त्याचेही स्क्रीन शॉट ग्रुपवर पाठवितात. अभ्यास पूर्ण होताच ग्रुपवर त्याचे फोटो पाठवितात. त्यात काही चुका व बदल असल्यास तसे मुलांना सांगतो. त्यानंतर दररोज एक गोष्ट ग्रुपवर पाठवितो. त्याचेही प्रकट वाचन मुले घरात करतात. तसेच उपयोगी असणाऱ्या व शिक्षणविषयक व्हिडिओच्या लिंक्स पाठवितो त्या पाहत पाहत मुले शिकतात. झूम ॲप मध्ये व्हाईट बोर्डच्या साहाय्याने शिकवितो. त्यामुळे मुलांना न समजलेले घटक समजण्यास मदत होते. तसेच पाढे पाठांतर, शब्द पाठांतर यांचीही उजळणी या वेळेस घेण्यात येते.

ज्यांच्याकडे अँड्रॉइड मोबाईल नाही अशा पालकांना कॉल करून अभ्यासाची विचारणा करतो.

यामुळे मुलांना लॉकडाऊनच्या काळातही घरी बसून कंटाळा न येता उलट दररोज शाळा सुरू असल्याचा अनुभव येत आहे. मुले आनंदाने अभ्यास करतात व झूम ॲपवरच्या सेशनची वाट पाहत असतात. ऑनलाईन तासामुळे केवळ गुरुजींनाच नाही, तर विद्यार्थ्यांना त्यांच्या मित्रांनाही घरी बसूनच भेटता येते. या कामात माझे मुख्याध्यापक श्रीराम पुजारी यांचेही सहकार्य लाभत आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदा १ मे रोजी सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षाचा निकाल कसा द्यावा याबाबत विचार केला. मी शाळेचे स्वत:चे शैक्षणिक संकेतस्थळ बनविले. त्यावर महाराष्ट्र दिनादिवशीच ऑनलाईन निकाल लावायचे ठरविले आणि त्याप्रमाणे १ मे ला महाराष्ट्र दिनादिवशीच ऑनलाईन निकाल जाहीर केला. ऑनलाईन निकाल मिळाल्यामुळे पालकांनाही त्याचे कौतुक वाटले.

'शाळेला गावाचा आधार व गावाला शाळेचा अभिमान' या शाळेच्या वेबसाईटचे उद्घाटन उस्मानाबाद डायटचे प्राचार्य डॉ. इब्राहिम नदाफ, शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार, गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार यांच्या उपस्थितीत झाले. महाराष्ट्र दिनादिवशीच सकाळी १० वाजता मान्यवरांच्या हस्ते ऑनलाईन मीटिंगमध्ये व्हिडिओ शेअर करून व वेबसाईट उघडून निकाल घोषित करण्यात आला. हा उपक्रम राबविल्याबद्दल अनेकांनी कौतुक केले. मी या वेबसाईटवर शाळेत राबवीत असलेले उपक्रम तसेच विद्यार्थी व पालकांसाठी उपयुक्त माहिती व लिंक उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच पालकही अपडेट राहतात.

तसेच शाळेच्या या वेबसाईटच्या माध्यमातूनच प्रवेशपात्र विद्यार्थ्यांच्या माहितीचे संकलन करून सन २०२०–२१ मधील ऑनलाईन प्रवेश देण्याचे काम चालू करण्यात आलेले आहे. तसेच ऑनलाईन शिक्षणासाठी उपयुक्त माहिती या वेबसाईटवर उपलब्ध आहे. www.zppsjagdambanagar.blogspot.com हा या वेबसाईटचा ॲड्रेस आहे. आमच्या जिल्हा परिषद शाळेची स्वतःची वेबसाईट आहे. तसेच ऑनलाईन मार्गदर्शन, ऑनलाईन निकाल आणि इतरही नावीन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबविले जात आहेत. जिल्ह्यात शाळेचा नावलौकिक उपक्रमशील शाळा म्हणून होत आहे.

आजही ऑनलाईन तास व अभ्यास नियमित चालू आहे. या कोरोनाच्या संकटातून लवकर मुक्ती व्हावी व सर्वांनाच आपले आवडते अध्यापनाचे काम प्रत्यक्ष करण्यास मिळावे यापेक्षा सध्या तरी दुसरे काही नको! होय ना..

◈◈◈


## वर्गणीदारांसाठी सूचना

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/– (रुपये तीनशे फक्त) आहे. आपली वर्गणी **'संपादक, जीवन शिक्षण, पुणे ३०'** या नावे **'स्टेट बँक ऑफ इंडिया'**च्या कोणत्याही शाखेत बचत खाते क्र. **11153675105** मध्ये भरावी. बँकेत पैसे भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत, स्वत:चा पूर्ण पत्ता, (पिनकोड द्यावा.) मोबाईल नंबर व ई–मेल आयडीसह पोस्टाने अथवा ई–मेलने jeevanshikshan@maa.ac.in वर पाठवावी. 'जीवन शिक्षण'ची वार्षिक वर्गणी अथवा पुस्तके मागणीसाठीचे पैसे मनीऑर्डरनेही स्वीकारले जातील.




६ जुलै : ज्येष्ठ साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर जन्मदिन (१९२७)

# गरज समुपदेशनाची

**डॉ. रत्ना चौधरी**

समुपदेशक ◆ भ्रमणध्वनी : ९५६१६०११५१

*आजच्या प्रगत वेगवान आणि स्पर्धेच्या जगात ताणतणाव वाढलेले आहेतच; त्यात कोरोना महामारीची धास्ती आणि लॉकडाऊनने ठप्प झालेले जीवन. शाळा कॉलेजेस बंद. त्यामुळे नवीन उमेद घेऊन भरारी मारायला सज्ज झालेले विद्यार्थीही फार मोठ्या ताणाला सामोरे जात आहेत. त्यातून सावरण्यासाठी गरज आहे समुपदेशनाची म्हणूनच त्याविषयी...*

## कलचाचणी अहवाल व विद्यार्थ्यांचे समुपदेशन :

संपूर्ण देशात शैक्षणिक सत्र सुरू होण्याबाबत आणि परीक्षांबाबत सर्वत्र संभ्रम निर्माण झालेला दिसतो. विद्यापीठीय ते के.जी. पर्यंतच्या शैक्षणिक सत्रांबाबत अजूनही स्पष्ट भूमिका नाही. ही परिस्थितीजन्य समस्या आहे आणि याचे कारण आपल्याला माहीत आहे. कोरोनाच्या वैश्विक समस्येतून जात असताना परिस्थितीजन्य, प्रासंगिक निर्णय घेत अनेक समस्या, अडचणी व संकटांशी सामना करून आपल्याला कोरोनावर मात करायची आहे. अशा एकंदर सर्व स्थितीवर गंभीरपणे विचार करून महाराष्ट्र शासन कलचाचणी अहवाल व समुपदेशन हा स्तुत्य उपक्रम राबवीत आहे.

करिअरला दिशा देण्यासाठी राज्य शासनाने ‘महाकरिअर पोर्टल’ दि. २२ मे २०२० रोजी लाँच केले आहे. महाकरिअर पोर्टल नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त असून विद्यार्थी आपल्या सरल आय.डी. मार्फत व १२३४५६ हा पासवर्ड वापरून यामध्ये असणारे २,८०,००० करिअर कोर्सेस, ११३८ एंट्रन्स परीक्षा, ३१,००० महाविद्यालयांची संपूर्ण माहिती, १४ पेक्षा जास्त परराष्ट्रातील कॉलेजेसची माहिती, सोबत अनेक पर्यायी करिअरच्या संधी संदर्भासह या पोर्टलद्वारे उदाहरणांसह सविस्तर निरंतर अपडेट मिळवू शकतात. हे पोर्टल समुपदेशकांसाठी उपयुक्त आहेच, पण विद्यार्थ्यांबरोबर पालकांसाठीही उपयुक्त आहे.

कलचाचणी म्हणजे आपण नक्की करिअरमध्ये काय करू शकतो आणि भविष्यकाळाच्या दृष्टीने काय करणे योग्य असेल हे समजून घेण्यासाठी मदत करणारे वस्तुनिष्ठ साधन म्हणजे कलमापन चाचणी होय. २०१६ पूर्वी प्रत्येक विभागात मे-जून महिन्यात वर्ग दहावी व बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांना मानसशास्त्रीय कसोट्या देऊन व्यवसाय मार्गदर्शन निवड संस्था, मुंबई येथून प्रशिक्षित झालेले समुपदेशक आपापल्या विभागात समुपदेशन करीत असत परंतु आता मानसशास्त्रीय चाचणी प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचायला पाहिजे या हेतूने शासनाने २०१६ पासून सर्वच दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी कलचाचणीचे आयोजन केल्यामुळे आजतागायत ५० ते ५५ लाख विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला आहे.

## कलचाचणी दहावी परीक्षेनंतर का?

सोळाव्या वर्षानंतर विद्यार्थी स्वविश्लेषणात्मक विचार करू लागतो, म्हणजेच मी कोण आहे, मला काय बनायचे आहे किंवा मी कोण होणार अशी ‘स्व’ ची जाणीव होते. ‘स्व’ जाणिवेतून ते स्वमताकडे बघायला लागतात. कुमार अवस्थेकडे पदार्पण व हार्मोन्स बदल या दृष्टीने विद्यार्थी ‘स्व’ व ‘स्व-मत’ याविषयी जागृत दिशेकडे वळतो.

आपला शिक्षणाचा पॅटर्न दहावी नंतर करिअरसाठी महत्त्वाचा असल्याने विद्यार्थ्यांची बलस्थाने व उणिवा कळण्याच्या दृष्टीने ही कलचाचणी उपयुक्त ठरते. १४० प्रश्न, त्या त्या अभियोग्यतेनुसार १५ प्रश्न क्षमता, कल, अभिरुची, अभियोग्यता मापन केल्याने विद्यार्थी करिअरसाठी मानसशास्त्रीय वस्तुनिष्ठ साधन म्हणून कलचाचणी महत्त्वाची ठरते.

या कलमापन चाचणीमध्ये ७ क्षेत्रे आहेत. यात कृषी, ललितकला, वाणिज्य, तांत्रिक, कला, गणवेशधारी, आरोग्य विज्ञान ही क्षेत्रे आहेत. ही क्षेत्रे ओळखण्यासाठी भाषिक क्षमता, तार्किक क्षमता, सांख्यिकीय क्षमता, अवकाशीय क्षमता, इत्यादी कलचाचणीत असलेल्या प्रश्नांतून विद्यार्थ्यांचा कल व अभियोग्यता मापली जाते. मात्र विद्यार्थ्याने कलचाचणी गांभीर्याने सोडविली पाहिजे. जर अस्थिरपणे चाचणी सोडविली असेल तर कलचाचणीच्या निकषांवर परिणाम होऊन निष्कर्ष किंवा परिणामामध्ये सत्यता कमी असण्याची शक्यता असते.

शैक्षणिक परिस्थिती, गुणवत्ता, व्यक्तिमत्त्व गुणमापन, विचार कौशल्ये, बौद्धिक क्षमता, आर्थिक स्थिती या सर्वांच्या संकलित निष्कर्षावरून आपल्या करिअर निवडीला जास्त नेमकेपणा आणता येतो. अर्थातच यासाठी करिअर मार्गदर्शक समुपदेशकाची गरज असते.

### मग हा समुपदेशक कोठून येतो?

शासनाच्या व्यवसाय मार्गदर्शन निवड संस्थेद्वारे एक वर्षाचा कोर्स केलेला व शासनाचे प्रशिक्षण झालेला प्रशिक्षित शिक्षक हा समुपदेशक असतो. महाराष्ट्रात ४५० पेक्षा अधिक समुपदेशक आहेत.

मा. संचालक SCERT महाराष्ट्र, पुणे यांनी कलचाचणी निकालापुरती राहू नये, तर अहवालाचे विश्लेषण, स्पष्टीकरण व्हावे या उदात्त हेतूने या वर्षीपासून म्हणजेच या लॉकडाऊनच्या काळात कल मापन चाचणी अहवाल व विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन व्हावे यासाठी, राज्यशासन प्रशिक्षित (IVGS) ४२५ समुपदेशक व NCERT येथील महाराष्ट्रातील १० समुपदेशक अशा एकूण ४३५ समुपदेशकांची समुपदेशनासाठी निःशुल्क सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

हा उपक्रम दि. ४ मे २०२० पासून सुरू करण्यात आला असून कलचाचणी दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १५,७६,८१६ एवढी आहे. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी तसेच मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक जिल्हानिहाय समुपदेशक आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील समन्वयक यांच्या नावांची यादी, फोन नंबर व ई-मेल ॲड्रेससह उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे कार्य SCERT, पुणे कार्यालयामार्फत आजतागायात सुरूच आहे. महाकरिअर मित्र ॲप डाऊनलोड करून दहावीचा बैठक क्रमांक टाकून कल अहवालावर क्लिक करून अहवाल पाहता येतो. महाकरिअर पोर्टल डॉट कॉमवर लॉगिन होण्यासाठी विद्यार्थी सरल आय. डी. व पासवर्ड टाकून या पोर्टलमध्ये असणाऱ्या माहितीचा लाभ घेऊ शकतो.

### पोर्टलची प्रमुख वैशिष्ट्ये

- १३,७२८ शासकीय व अनुदानित शाळांमधील ३७.९ लाख विद्यार्थी या करिअर पोर्टलचा उपयोग करू शकतील.
- प्रत्येक विद्यार्थ्याचा वैयक्तिक डॅशबोर्ड असणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचा लॉग इन ID हा वेगळा असून, त्याच्या सरल ID चा उपयोग त्यासाठी करायचा आहे. हा ID त्याला शाळेमधून सहज उपलब्ध होईल. १२३४५६ हा password सर्व विद्यार्थ्यांसाठी सारखाच असेल. या प्रक्रियेतून प्रत्येक विद्यार्थ्याचा स्वतंत्र डॅशबोर्ड तयार होऊन



७ जुलै : भारत इतिहास संशोधन मंडळाची स्थापना (१९१०)

विद्यार्थी स्वतःच्या करिअरच्या वाटा स्वतंत्ररित्या शोधू शकेल.

- या पोर्टलवर ५५५ व्यावसायिक आणि कौशल्याधिष्ठित करिअरची स्वतंत्रपणे माहिती उपलब्ध करून दिली आहे. ही माहिती इंग्लिश आणि मराठी या दोन्ही भाषेत उपलब्ध आहे.
- या पोर्टलवर २१,१२२ महाविद्यालये, व्यावसायिक संस्था यांची माहिती उपलब्ध असून भारत व इतर १५ देशांतील २.६२ लाख अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली आहे.
- भारतात विविध अभ्यासक्रमासाठी होणाऱ्या ११२७ प्रवेश परीक्षांची, प्रवेश परीक्षेची तारीख, अर्ज करण्याची प्रक्रिया, पात्रता व विविध निकष यांसह सविस्तर माहिती वेळोवेळी या पोर्टलवर उपलब्ध होणार आहे.
- आंतरराष्ट्रीय व भारतातील ११२७ शिष्यवृत्तीं-बद्दलची विस्तृत माहिती तसेच शासन पुरस्कृत विविध शाळास्तरीय स्पर्धा परीक्षांची माहिती या पोर्टलवर उपलब्ध होऊ शकेल.
- लिंग समभावाचे मूल्य जपत या पोर्टलवर मुले आणि मुलींना समान संधी देणाऱ्या अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली आहे.
- सदर पोर्टल हे सर्वसमावेशक असून प्रत्येक विद्यार्थ्याच्या विशेष क्षमता लक्षात घेऊन त्याच्या करिअरच्या वाटा निर्देशित करते.
- सदर पोर्टलचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे यात दिलेल्या ५५५ करिअरवर कोविड-१९ चा काय परिणाम झाला आहे तसेच कोविड-१९ मुळे विविध करिअर आणि उद्योगधंद्यांची भविष्यातील स्थिती काय आहे यांबद्दल सविस्तर माहिती यावर उपलब्ध आहे.

दि. २७ मे पासून आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांनी या पोर्टलला भेट दिलेली आहे. सोबत संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांनी या शासनाच्या समुपदेशन सेवेचा लाभ घेतला आहे. संपूर्ण मार्गदर्शन फोनवरून व इतर ऑनलाईनच्या माध्यमांतून देऊन दैनंदिन अहवाल प्रत्येक समुपदेशक गुगल फॉर्ममध्ये भरून रोजच्या रोज कार्यालयीन वेळेत पोहोचवीत असतो.

### विद्यार्थ्यांचे भावविश्व :

सद्य:स्थितीत परीक्षा, परीक्षेचा निकाल, प्रवेश प्रक्रिया आणि आरोग्य इ. बाबतीत साशंकता व अस्पष्टता असून विद्यार्थ्यांच्या मनात करिअरबाबत स्पष्टतेविषयी अनेक प्रश्न घोळत आहेत. नुकतीच कुमारावस्थेला सुरुवात आणि ही टाळेबंदी. या संवेदनशील काळात विद्यार्थ्यांना करिअर दिशा ठरविताना येणारी मुख्य अडचण म्हणजे पालकांच्या अपेक्षा, दबाव, आग्रह आणि आजूबाजूच्या गोष्टींचे अनुकरण. पालकांचा एकुलता एक पाल्य आणि पालक अतिमहत्त्वाकांक्षी; यांतून विद्यार्थी एकलकोंडा झालेला दिसतो.

येत्या १० वर्षांत मेडिकल फिल्डला प्रमाणापेक्षा अधिक महत्त्व असेल, व्यवसायाचे स्वरूप ऑनलाईन झालेले असेल. संगणकीय तंत्रज्ञानाचा प्रभाव मानवी व्यवसायावर झालेला असून घरी राहून काम करणे असा दीर्घ परिणाम येत्या काळात दिसून येईल. मोबाईलचा वापर, सतत जागरणे, यांमुळे डोळ्यांच्या आणि इतरही आरोग्याच्या तक्रारी जाणवतील.

पालकांनी आपल्या पाल्याबाबत भाकितावर नाही तर वस्तुस्थिती बघून निर्णय घेणे आवश्यक आहे. कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम व क्षेत्रे तसेच अनेक अभ्यासक्रमांची पालक विद्यार्थ्यांना ओळख करून देत नाहीत आणि त्यांच्या आवडीच्या क्षेत्रांपर्यंत पोहोचू देत नाहीत. आपल्या मुलाच्या बौद्धिक क्षमतेचा शोध घेऊन, प्रत्येकाची गती वेगळी असते याचा साकल्याने विचार

करणे आवश्यक आहे. कौशल्याधिष्ठित व व्होकेशनल कोर्सेसमध्ये रोजगाराच्या उत्तम संधी आहेत. पालकांनी पाल्यांना तिथपर्यंत जाऊ देण्याची मानसिकता ठेवायला हवी.

पालकांनी मुलांना नुसते वाढविण्यापेक्षा त्यांच्या विकासासाठी त्यांना मदत करावी. मूल मोठे होत राहणार, समस्येचे स्वरूप बदलत राहणार म्हणून समस्येची उकल उद्यावर ढकलून चालणार नाही कारण विद्यार्थी आपले व्यक्तिमत्त्व, आपली ओळख निर्माण करण्याकरिता या वयात धडपड करीत असतात.

विश्वासाने मन जिंकता येते तर आत्मविश्वासाने जग! बांधलेल्या दोऱ्या सोडून बघा, मनातील साठवून ठेवलेल्या गाठी सोडा, निखळ खदखदून हसा, दुःखात सुख शोधा, 'बस्स! फक्त आजचा दिवस' आपले कार्य पूर्ण आशावादाने करा, येणारा नवीन दिवस नवी उमेद घेऊन येत असतो. ज्यांची भाषा, विचार सकारात्मक ते समस्या चुटकीसरशी सोडवितात. जीवन सुंदर आहे. जन्माचे सार्थक करणे हे ज्याच्या त्याच्या हातात आहे! आपल्या व्यक्तिमत्त्वातील 'स्व' ची जाण, 'स्व–मत', सकारात्मकता, आत्मपरीक्षण, छंद जोपासणे, इत्यादी पैलूंकडे जाणीवपूर्वक लक्ष द्या.

◈◈◈

---

**(पृष्ठ क्र. १३ वरून)**

आणि लय हे कार्य गुरू करीत असतो. ज्ञानार्जनासाठी लागणारी जिज्ञासा, मानसिक तयारी गुरू करून घेतो. मिळालेले ज्ञान सुव्यवस्थित राखण्याची आणि योग्य वेळी त्याचे उपयोजन करण्याची संधी गुरू विद्यार्थ्याला मिळवून देतो. अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करण्याचे कार्यही गुरूच करतो. मार्गदर्शनाचे कार्य गुरू करीत असतो. गुरूला प्रसंगानुरूप माता, पिता, बंधू, सखा या भूमिका पार पाडाव्या लागतात. कधी प्रेमळ तर कधी कठोरही व्हावे लागते, पण त्याच्या मनात आपल्या शिष्याचे भले व्हावे हीच तळमळ असते.

गुरू म्हटले की, आपल्यासमोर जाणकार, अनुभवी, वयस्कर अशा व्यक्तींचे चित्र उभे राहते, पण आता मात्र, आजच्या अत्यंत प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात 'गुरू' शब्दाची व्याख्याच बदलली. आज नव्या तरुण पिढीजवळ तंत्रज्ञान जास्त असते आणि त्यांच्याकडून जुन्या पिढीला शिकावे लागते! आजी–आजोबांना मोबाईल कसा वापरायचा हे नात–नातू शिकवितात; याचा अर्थ गुरूंच्या वयाकडे न पाहता ज्ञानाकडे पहावे.

गुरू म्हणजे व्यक्तीच असावी ही धारणाही आपण बदलायला हवी कारण या सृष्टीतील प्रत्येक गोष्ट आपल्याला काही तरी शिकवून जात असते म्हणूनच गाडगे महाराज म्हणतात, 'निसर्ग माझा गुरू आहे.' आयुष्याच्या कोणत्या टप्प्यावर आपल्याला कोण मार्गदर्शन करेल हे सांगता येत नाही, असे प्रत्येक मार्गदर्शक आपले गुरूच आहेत.

प्रत्येक शिक्षकाने आयुष्यभर विद्यार्थी रहावे आणि किमान साने गुरुजींचे 'श्यामची आई', 'तोत्तोचान' आणि 'अब्राहम लिंकन यांचे हेडमास्तरांस पत्र' वाचलेले असावे ही अपेक्षा व्यक्त करून माझ्या ज्ञात, अज्ञात गुरूंना मन:पूर्वक वंदन करते.

◈◈◈



९ जुलै : कविवर्य बा. भ. बोरकर स्मृतिदिन (१९८४)

# नवे बदल नवे शिक्षण

**डॉ. वैशाली जहागीरदार**

ज्येष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना ◆ भ्रमणध्वनी : ८२०८७४४१९०

*आईची जागा जशी कोणी घेऊ शकत नाही, तद्वतच शिक्षकाची जागाही कोणी घेऊ शकत नाही. अध्यापनाच्या पद्धती बदलल्या, ऑनलाईन शिक्षण सुरू झाले तरी गुरुजींना पर्याय नाही. अर्थात बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाने झालेल्या बदलांनुसार त्यांनी अपडेट रहायला हवे हे विसरून चालणार नाही; याविषयी...*

काळानुसार प्रत्येक गोष्टीत बदल घडत असतो. शिक्षणप्रक्रियेत देखील नवनवीन बदल अनुभवायला मिळतात. शिक्षणाने नेहमीच वास्तवाचे भान ठेवत भविष्याचा वेध घेतला आहे. संवेदनशील, विवेकनिष्ठ व्यक्ती आणि समाजनिर्मिती हा शिक्षणाचा उद्देश. या उद्देशाच्या पूर्तीसाठी शिक्षणप्रक्रियेत सातत्याने बदल केले जातात. नवीन पद्धती, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके हे बदल पेलण्यासाठी सिद्ध केली जातात.

शिक्षणप्रक्रियेतील सातत्याने होणाऱ्या बदलांचा अपेक्षित परिणाम साधायचा असेल तर या प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक असणाऱ्या शिक्षकांना देखील या नावीन्याचा स्वीकार करीत वास्तवाचे भान ठेवून भविष्याचा वेध घ्यावा लागेल. शिक्षण प्रक्रियेतील या नव्या आयामांशी स्वतःला जोडावे लागेल. शिक्षकाने सतत प्रयोगशील आणि उपक्रमशील राहून स्वतःला या आधुनिकतेशी जोडायला हवे. असा शिक्षक ही काळाची गरज ठरणार आहे.

नवीन गोष्ट हाती घेणे, कधी जुनीच गोष्ट नव्या पद्धतीने करणे, जुन्या गोष्टीला नवे संदर्भ जोडून ती अद्ययावत करणे या सर्वांद्वारे समस्यांचे निराकरण करणे, चिकित्सक व सर्जनात्मक विचार करणे आणि आपल्या विद्यार्थ्यांना त्यासाठी सक्षम बनविणे अशी आव्हानात्मक कामे इथून पुढे शिक्षकांना करावी लागणार आहेत; त्याशिवाय अपेक्षित ध्येय गाठणे अशक्य आहे. विद्यार्थी गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करणारा, अभिव्यक्ती विकसनासाठी प्रयोगशील, मूल्यवर्धनासाठी उपक्रमशील असणारा, स्वतःहून जबाबदारी घेणारा आणि नव्या बदलांना सकारात्मक मानसिकतेने सामोरे जाणारा शिक्षकच शिक्षण प्रक्रियेचा एक महत्त्वाचा घटक ठरणार आहे. यासाठी सर्वप्रथम शिक्षणातील चाकोरीबद्ध पद्धती बदलावी लागेल, मुलांना शिकविण्याच्या पद्धती बदलाव्या लागतील आणि मुख्य म्हणजे काय आणि कशासाठी शिकवायचे हे शिक्षकांना स्वतःला समजून घ्यावे लागेल. आपल्या पारंपरिक शिक्षण पद्धतीत आपण त्यांना जे शिक्षण देत आहोत ते कालसुसंगत आहे का याचा विचार करावा लागेल आणि त्यानुसार अभ्यासक्रमात बदल करावे लागतील. आजवर शिक्षण कशासाठी, तर नोकरी मिळविण्यासाठी अशीच मानसिकता सर्वांची दिसून येत आहे, पण आज जी मुले पाचव्या इयत्तेत शिक्षण घेत आहेत त्यांना अजून पंधरा वर्षांनंतर कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या कराव्या लागणार आहेत, ज्या कदाचित आज अस्तित्वात देखील नसतील. मग शिक्षण फक्त नोकरी मिळविण्याचे एक साधन असे आता असणार नाही, हे विद्यार्थी व पालकांना पटवून देण्यासाठी आणि

**(पृष्ठ क्र. २४ वर)**


BRITISH COUNCIL

LearnEnglish Kids

# LABEL THE PICTURE

Whats your bedroom like?
Try to label everything in this bedroom.

1 ........................................
2 ........................................
3 ........................................
4 ........................................
5 ........................................
6 ........................................
7 ........................................
8 ........................................




**poster lamp bookshelf CD player bookcase blanket alarm clock pillow**

**Answers** 1. blanket 2. poster 3. bookcase 4. alarm clock 5. pillow 6. CD player 7. lamp 8. bookshelf

You can play this game and more online at:
**www.britishcouncil.org/learnenglishkids**



१२ जुलै : पानशेत धरण फुटल्याने पुण्यात महाप्रलय (१९६१)

BRITISH COUNCIL

LearnEnglish Kids

# WORDSEARCH

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| R | S | C | O | O | T | E | R | W | S |
| G | P | B | F | J | U | M | E | B | M |
| S | I | L | O | B | E | T | F | C | R |
| I | H | C | O | O | D | E | Q | T | G |
| C | S | R | T | O | P | D | C | L | Y |
| A | E | A | B | K | B | D | T | A | Q |
| M | C | Y | A | S | O | Y | O | G | R |
| E | A | O | L | L | P | W | B | J | N |
| R | P | N | L | B | T | R | O | B | O |
| A | S | S | N | N | I | E | R | U | N |

**Answers** 1. scooter 2. crayons 3. teddy 4. football 5. car 6. spaceship 7. dolly 8. robot 9. books 10. camera

1. This toy is like a bicycle, but you stand up to use it.
2. You can use these to colour in your drawings.
3. A toy bear.
4. This is round and you can kick it.
5. You can drive to the toyshop in one of these.
6. Imagine travelling to other planets in one of these.
7. You can dress them up and do their hair.
8. A mechanical figure, some of them can move and talk.
9. You can read all kinds of stories in one of these.
10. You can take pictures of your family with one of these.

You can play this game and more online at:
**www.britishcouncil.org/learnenglishkids**

(पृष्ठ क्र. २१ वरून)

भविष्यातील अशा आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याचे काम शिक्षकांना करावे लागणार आहे.

कोविड-१९ आणि लॉकडाऊनच्या या काळात जगभरातील विद्यार्थी शाळेतील आंतरक्रियात्मक शिक्षणापासून दूर आहेत. यामुळे शिक्षणप्रक्रियेत व्यापक बदल होत आहेत. शाळेची वेळ, विद्यार्थी संख्या, विषयांची संख्या, अध्ययन-अध्यापन पद्धती, मूल्यमापन, परीक्षांचे स्वरूप, ऑनलाइन शिक्षक-शिक्षण, सोशल डिस्टनसिंग, फिजिकल डिस्टनसिंग या साऱ्यांमुळे परिघात अनेक बदल होऊ घातले आहेत.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांनी शिक्षणाचा संबंध भविष्याशी जोडताना E बरोबर F म्हणजे शिक्षण बरोबर भविष्य हे सूत्र मांडले, तर महात्मा गांधींनी 3H (हॅन्ड, हेड आणि हार्ट) चा विकास म्हणजे शिक्षण हे सूत्र सांगितले होते. समानतेवर आधारित विवेकनिष्ठ आणि संवेदनशील समाज निर्मितीसाठी व्यक्तीची भावनिक, शारीरिक, मानसिक व सामाजिक जडणघडण हे शिक्षणाचे मुख्य ध्येय राहिले आहे. कोठारी आयोगाने तर म्हटले आहे की, भारताचे भवितव्य शाळांच्या वर्गावर्गातून घडते आहे परंतु या कोरोनाच्या काळात मात्र पूर्वीसारखे प्रत्यक्ष वर्ग खोल्यांत घडणारे शिक्षण सध्या तरी असेलच असे नाही. विद्यार्थी वर्गाबाहेर असणार आहेत आणि म्हणून लर्निंग फ्रॉम होम, ई-स्कूलिंग महत्त्वाचे ठरणार आहे. यासाठी दूरस्थ शिक्षण, मुक्त शिक्षण यांचा स्वीकार करावा लागेल. दीक्षा ॲप, ऑनलाइन लर्निंग, ऑडिओ, व्हिडिओ माध्यमे, रेडिओ आणि दूरचित्रवाणी यांचा वापर करण्याचे प्रयत्न शासन स्तरावर सुरू आहेत. सध्या शिक्षक, पालक, विद्यार्थी यांचे व्हाट्सॲप ग्रुपद्वारे माहितीचे आदान-प्रदान सुरू आहे. अर्थात शिक्षणाचा हेतू फक्त माहिती पोहोचविणे किंवा अभ्यासक्रम शिकविणे इतकाच नसून व्यवसायाभिमुख शिक्षण, मूल्यसंस्कारित पिढी, नेतृत्व विकसन आणि जीवन कौशल्यांचा स्वीकार हे आजच्या इंटरनेट आणि तंत्रज्ञानाच्या युगातही महत्त्वाचे ठरणार आहे.

आजवर आपण चाकोरीबद्ध रीतीने इयत्ता, वर्ग, तुकड्या, आकृतिबंध, पाठ्यघटक आणि मूल्यमापन यांचाच विचार करीत आहोत, पण भविष्यात मात्र सर्वांनाच किती तरी वेगवेगळ्या विषयांना सामोरे जावे लागणार आहे; (उदा. रोबोटिक्स, डिझास्टर, मॅनेजमेंट) म्हणजे मुले आज जे शिकतात त्यापेक्षा खूप वेगळ्या विषयांना आणि आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी संशोधन, चाकोरी सोडून वेगळ्या विषयांची संरचना महत्त्वाची ठरणार आहे. जसे, शिक्षणात व्यवस्थापन शास्त्र तर मेडिकलच्या विद्यार्थ्यांना आय. टी. शिकावे लागणार आहे. हेच शिक्षण नव्या विचारांची दिशा दाखविणारे, नवनिर्मिती करू शकणारे आणि संशोधन सिद्ध ठरणार आहे.

या अभ्यासक्रमाला नव्या व्यावसायिक अभ्यास-क्रमाची, सॉफ्ट स्किलची जोड द्यावी लागणार आहे. समस्यांचे निराकरण, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, सामाजिक, भावनिक, शारीरिक, बौद्धिक कौशल्यांचा विकास यांवर भर देणारे विषय अभ्यासक्रमात आणावे लागतील. यातून चिकित्सक आणि सर्जनशील विचार करू शकणारी सक्षम नवी पिढी घडविता येईल.

विद्यार्थ्यांमध्ये क्रिटिकल थिंकिंग, कोलॅबरेशन, कम्युनिकेशन आणि क्रिएटिव्हिटी या चार C चा विकास करणे हे शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रापुढील मुख्य आव्हान असणार आहे. पहिला C म्हणजे क्रिटिकल थिंकिंग. विद्यार्थ्यांना जीवन जगताना येणाऱ्या विविध समस्यांचा सामना सक्षमतेने करता यावा यासाठी त्यांच्यामध्ये वैयक्तिक किंवा गटात काही काल्पनिक समस्यांवर



१४ जुलै : गोपाळ गणेश आगरकर जन्मदिन (१८५६)

स्वतः स्वतंत्रपणे विचार करून उपाय शोधण्याची सवय रुजवावी लागेल. यामुळे आयुष्यात आकस्मिक पुढे उभ्या ठाकणाऱ्या संकटामुळे ती विचलित न होता त्यावर सहज मात करू शकतील आणि आत्महत्येसारख्या घटना टाळता येतील.

दुसरा C म्हणजे कोलॅबरेशन म्हणजे संघटन, टीमवर्क! यासाठी हे उत्तम उदाहरण ठरू शकते. मैदानी खेळ सर्वांच्या सहकार्याने, एक विचाराने कोणतेही ध्येय सहज साध्य होते, हे मैदानी खेळ मुलांना शिकवितात. कोणतीही समस्या सोडविताना सहकारी, मित्र, परिवार यांतील अनेकांच्या क्षमतांचा सुयोग्य वापर करून घेण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित केल्यास त्यांच्यातील नेतृत्वगुणाचा विकास तर होईलच, पण सामाजिक सलोखा, संघटन, सहकार्य भावना हे गुणही विकसित होतील; जे त्यांना भविष्यात उपयुक्त ठरतील.

तिसरा C म्हणजे कम्युनिकेशन. आजच्या जाहिरातीच्या युगात हे कौशल्य किती महत्त्वाचे आहे हे आपण सर्व जाणतोच. योग्य वेळी योग्य संवाद साधल्यास अनेक प्रश्नांचे निराकरण होते. मुलांचा पालकांशी, शिक्षकांशी सुयोग्य संवाद होत नसेल तर अनेक समस्या निर्माण होतात आणि त्यातून मुले अविचाराने वेगळ्या वाटेवर जाऊ शकतात म्हणून त्यांना व्यक्त होण्याचे, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य द्यायला हवे.

चौथा C म्हणजे क्रिएटिव्हिटी म्हणजे सर्जनशीलता. भविष्यात मुलांच्या फक्त मार्कांच्या हुशारीपेक्षा म्हणजे बुध्यंकापेक्षा, त्यांचा भावनिक विकास, सामाजिक विकास आणि सर्जनशील विकास हे जास्त महत्त्वाचे असणार आहेत म्हणून विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला पोषक वातावरण निर्माण करणाऱ्या शाळा आणि शिक्षक यांचे महत्त्व वाढणार आहे. त्यासाठी त्यांना वर्गात कोंडून न ठेवता त्यांच्यातील सर्जनशीलता मग ती चित्रकला, लेखन, गायन, नृत्य, अभिनय, वक्तृत्व अशा कोणत्याही क्षेत्रातील असो, ती ओळखून तिचा विकास कसा करावा याबाबत शिक्षकांना विद्यार्थी व त्याच्या पालकांचे मार्गदर्शक व्हावे लागणार आहे. हे सारे भविष्यातील सजग नागरिक आणि उत्तम समाज निर्मितीसाठी अत्यावश्यक असणार आहे. यासाठी शिक्षकाइतका प्रभावी घटक दुसरा असणार नाही. जे कृष्णमूर्ती, विनोबा भावे यांनी आपल्या शिक्षणविषयक चिंतनातून हेच पूर्वी सांगून ठेवले आहे. आता शिक्षकाची भूमिका खडू, फळा आणि पाठ्यपुस्तके यांपुरती मर्यादित न राहता आता तो खऱ्या अर्थाने त्याच्या विद्यार्थ्यांच्या जीवनाचा शिल्पकार ठरणार आहे!

असे झाले तरच भारत हा एकविसाव्या शतकातील महासत्ता होण्यासोबतच महान राष्ट्र म्हणून उदयास येऊ शकेल. म्हणूनच कोरोनासोबत आणि त्यानंतरच्या कालखंडात होऊ घातलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर बदलत्या शिक्षकाला सदाचार, सद्वर्तन, सद्भावना, सहयोग, सहकार्य, संप्रेषण आणि सर्जनात्मकता यांचा अंगीकार करीत पुढे जावे लागणार आहे. कल्पक, चौकटीबाहेरचा विचार करणाऱ्या आणि उत्साही शिक्षकांना उज्ज्वल भवितव्य असणार आहे. शिकविण्यापेक्षा शिकणे महत्त्वाचे मानत जो अपडेट होईल तो टिकून राहील असे आजचे वर्तमान सांगते आहे.

शिक्षक स्वतःला आणि आपल्या विद्यार्थ्यांना नेहमीच भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सज्ज करीत असतो; अगदी आपली प्राचीन गुरुकुल परंपरा ते आजचे ई–लर्निंग याची साक्ष देतात. असे सकारात्मक उत्क्रांत होताना आजच्या या संक्रमण काळात हजारो नचिकेत आपली वाट पाहत आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन करीतच त्यांच्या शिक्षणाची व जगण्याची वाट सुकर करण्याचे काम आपल्याकडून नक्कीच होईल हा विश्वास वाटतो!

# बुद्धिमत्ता भाव

**डॉ. संगिता महाजन**

अधिव्याख्याता, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नाशिक.

*''भावनिक बुद्धिमत्ता व शैक्षणिक बुद्धिमत्ता या दोन्ही क्षमतांचा समन्वय असणारी बुद्धिमत्ता म्हणजे आध्यात्मिक बुद्धिमत्ता होय.'' आध्यात्मिक बुद्धिमत्ता हाच सुदृढ समाज जीवनाचा पाया आहे. आध्यात्मिक बुद्धिमत्तेच्या विकासासाठी प्रत्यक्ष कृती व सराव महत्त्वाचा आहे. आध्यात्मिक दृष्टी ही इतरांमध्ये फक्त उत्कृष्ट (Only best) पाहते. त्यामुळे इतरांना उत्कृष्टतेचा विकास करण्यासाठी शक्ती मिळते. इतरांकडे पाहण्याची ही दृष्टी विद्यार्थ्यांना शिकविली गेली, तर उत्कृष्ट गुणवत्तेची ऊर्जा त्यांच्यात निर्माण होईल.*

बुद्धी ही अशी मानसिक शक्ती आहे की, त्यामध्ये सर्व मूलभूत मानसिक प्रक्रियांचा समावेश होतो. या प्रक्रियांच्या आविष्काराला संधी मिळाली, तर बुद्धीचा विकास होत जातो. बुद्धी विकासात संवेदनेला खूप महत्त्व आहे. संवेदन हा बुद्धी विकासाचा पहिला आविष्कार आहे. बुद्धी विकासात स्मरण प्रक्रिया अतिशय महत्त्वाची आहे. बुद्धीमुळे अनुभव व ज्ञानातून व्यक्तीला प्रश्न सोडविणे शक्य होते.

स्पर्धेच्या युगात व्यक्तीच्या जीवनात अनेक ताणतणावाचे प्रसंग येतात. समस्या उभ्या राहतात. त्या सोडविण्यासाठी स्व-समायोजनाची क्षमता अंगी असावी लागते आणि ही क्षमता 'भावनिक बुद्धिमत्तेमुळे येते.'

## आध्यात्मिक बुद्धिमत्ता :

ही संकल्पना सर्वप्रथम जोहर व मार्शल यांनी मांडली. त्यांच्या मते 'भावनिक बुद्धिमत्ता व शैक्षणिक बुद्धिमत्ता या दोन्ही क्षमतांचा समन्वय असणारी बुद्धिमत्ता म्हणजे आध्यात्मिक बुद्धिमत्ता होय.' ही व्यक्तीच्या जीवनात येणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी उपयुक्त ठरते. आध्यात्मिक बुद्धिमत्ता ही व्यक्तीला समायोजन करण्यासाठी तसेच आत्मविश्वास वाढण्यासाठी, सहकार्याची भावना विकसित करण्यासाठी मदत करते. आध्यात्मिक बुद्धिमत्ता हाच सुदृढ समाज जीवनाचा पाया आहे. Cindy Wigglesworth यांच्या मते 'आध्यात्मिक बुद्धिमत्ता म्हणजे अंतर्गत व बाह्य शांतता राखण्यासाठी वस्तुस्थितीची पर्वा न करता दया आणि शहाणपणाने वागण्याची क्षमता होय.'

Spiritual Intelligence is the ability to behave with compassion and wisdom while maintaining inner and outer peace regardless of the circumstances.

थोडक्यात, सारासार विचार करून योग्य निर्णय घेणे म्हणजे आध्यात्मिक बुद्धिमत्ता होय.

बुद्ध्यंक (IQ), भावनिक बुद्ध्यंक (EQ) व आध्यात्मिक बुद्ध्यंक (SQ) यांचे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील उपयोजन.

## बुद्धिमत्तेचे अध्ययन-अध्यापनातील उपयोजन :

बुद्धिमत्तेत विविध क्षमता अंतर्भूत आहेत. त्या क्षमता म्हणजे अध्ययन क्षमता, अमूर्त विचार क्षमता, समस्या निराकरण क्षमता, नवीन परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, निर्णय क्षमता, तर्क करण्याची क्षमता इत्यादी. अध्ययनार्थींनी (विद्यार्थ्यांनी) या क्षमतांचा पूर्णपणे उपयोग केला तर त्यांची सर्जनशीलता, शोधक



१५ जुलै : डॉ. चित्रा नाईक जन्मदिन (१९१८)

वृत्ती, कल्पनाशक्ती, नेतृत्व क्षमता, भाषिक विकास उत्तम प्रकारे होईल. अमूर्त चिंतन करण्याचे सामर्थ्य बुद्धीमुळे प्राप्त होते. अध्ययनकर्त्याला अमूर्त संकल्पना स्पष्ट होण्यासाठी शिक्षकांनी चित्रांचा, प्रत्यक्ष वस्तूंचा, प्रतिकृतींचा वापर अध्यापनात केला पाहिजे. 'बुद्धी म्हणजे ज्ञान व कौशल्य संपादन करण्यात कार्यरत असलेली मानसिक क्षमता होय.' या क्षमतेमुळेच श्रवण, वाचन, लेखनकौशल्य अध्ययनकर्त्याला अवगत होतात. बुद्धीच्या जोरावर तो ज्ञान प्राप्त करू शकतो. Intelligence in action becomes wisdom. बुद्धिमत्ता निरनिराळ्या प्रसंगी वापरली जाते. ती कृतीत उतरली की, तिचे रूपांतर शहाणपणा किंवा हुशारीत होते. अध्ययनकर्त्याला सतत क्रियाशील ठेवले पाहिजे. जॉन ड्युईचे तत्त्व "Learning by Doing" अध्यापनात उपयुक्त ठरते.

**भावनांकाचे अध्ययन-अध्यापनातील उपयोजन :**

भावनिक बुद्धिमत्ता शिक्षणासाठी उपयुक्त आहे. अंतर्गत व बाह्य समस्या सोडविण्यासाठी ही बुद्धिमत्ता उपयोगी ठरते. प्रगती करण्यासाठी, विविध कौशल्ये आत्मसात करण्यासाठी, उच्च संपादणुकीसाठी भावनांक महत्त्वाचा ठरतो. शाळेमध्ये सेल्फ टॉक (Self talk) चे आयोजन करून विद्यार्थ्यांना जे जे बोलायला आवडते ते बोलू द्यावे. शालेय व वैयक्तिक समस्यांवर चर्चासत्र आयोजित करावे. शाळेत भावभावना प्रकट करणारे प्रसंग, चित्रे, उद्गार वाक्ये, व्यंगचित्रे, कात्रणे यांचे प्रदर्शन आयोजित करावे. व्यायाम, खेळांचे तास आवर्जून अभ्यासक्रमात ठेवावेत, त्यामुळे भावनांचे उन्नयन होण्यास मदत होते. सहली, शिबिरे असे उपक्रम आयोजित करावेत. मुलांना परिस्थितीशी जुळवून घेण्यास याची मदत होते. शाळेत निबंधवाचन, चर्चा, नाट्यीकरण, कथाकथन, चित्रपटांवर चर्चा, वृत्तपत्रांतील बातम्यांवर चर्चा असे उपक्रम आयोजित करावेत. यातून मुलांना विविध भावनांच्या आधारे विचार करण्यास प्रवृत्त करता येते. कुटुंबातील, समाजातील व्यक्तींनी केलेल्या स्वार्थत्यागाची माहिती मिळविण्यासाठी त्यांना उद्युक्त करावे. या संदर्भात व्याख्यानांचे आयोजन करावे. चरित्रात्मक पुस्तके उपलब्ध करून द्यावीत. मुलांमध्ये नेतृत्व विकास होण्यासाठी प्रयत्न करावेत. अध्यापन पद्धतीत विविधता असावी. उदाहरणार्थ : भूमिकापालन पद्धती, समस्या निराकरण पद्धती, कथन पद्धती, नाट्यीकरण, गटचर्चा, सहल, क्षेत्रभेट, प्रदर्शन, मुलाखत, सर्वेक्षण इत्यादी.

**आध्यात्मिकबुद्ध्यंकाचे अध्ययन-अध्यापनप्रक्रियेतील उपयोजन :**

स्वकर्म निष्ठापूर्वक करण्याची क्षमता म्हणजे आध्यात्मिक बुद्धिमत्ता होय. शिक्षणाच्या माध्यमातून शारीरिक, बौद्धिक, भावनिक विकास होतो. व्यक्तींना मार्गदर्शन करण्याचे कार्य शिक्षण करीत असते. व्यक्तीच्या व समाजाच्या कल्याणासाठी ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग, तत्त्वज्ञानाचे शिक्षण आवश्यक आहे. हे तत्त्वज्ञान आत्मसात करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आध्यात्मिक बुद्धिमत्तेचा विकास शिक्षणाद्वारे करणे होय. आध्यात्मिक बुद्धिमत्ता हे जीवनाच्या सर्वांगाचे विवेचन करणारे तत्त्वज्ञान आहे. वैज्ञानिक, औद्योगिक क्रांतीतून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. उपभोग प्रधान वासनांचा व लालसांचा जीवनात अतिरेक झाला आहे. मानव हा अशांत व असमाधानी आहे. यातून मानवजातीची सुटका करण्यासाठी आध्यात्मिक बुद्धिमत्ता उपयोगी ठरते. शिक्षण हा समाज विकासाचा पाया आहे. शिक्षणामुळेच आध्यात्मिक बुद्धिमत्ता निर्माण होऊन समाज योग्य दिशेने वाटचाल करू शकतो. आध्यात्माची खरी जाण शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करू शकतो. यामुळे भावी पिढी ही सुदृढ व्यक्तिमत्त्वाची निर्माण होऊन समाज व राष्ट्र विकासाच्या कार्यात हातभार लागेल. विद्यार्थ्यांना आध्यात्मिक बुद्धिमत्तेचे महत्त्व समजण्यासाठी व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळांचे आयोजन केले पाहिजे.

(पृष्ठ क्र. ३२ वर)

# इंग्रजी विषयाच्या शिक्षकांसाठी

**डॉ. सुभाष कांबळे**

संचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (आंग्लभाषा तज्ज्ञत्व), औरंगाबाद.

*प्रादेशिक विद्या प्राधिकरण (आंग्लभाषा तज्ज्ञत्व), औरंगाबाद यांच्या मार्फत प्राथमिक शाळांमधील इंग्रजी भाषेची गुणवत्ता सुधारणे आणि इंग्रजीचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा व्यावसायिक विकास साधणे या दृष्टीने विविध प्रकल्प राबविण्यात येतात. यांच्याच मार्फत माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता नववी व दहावीला इंग्रजी भाषा विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी तीन (३) वर्षांकरिता हा CHESS प्रकल्प आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सन २०१७-१८ पासून राबविण्यात आला आहे त्याविषयी...*

**(क्रमश:)**

**क) CHESS (चेस) : Continuous Help to the teachers of English from Secondary Schools :**

**केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान :** गुणवत्ता या मुख्य उपक्रमांतर्गत MHRD यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील शासकीय आणि शासकीय अनुदानित खाजगी व्यवस्थापनाच्या माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता नववी व दहावीला इंग्रजी भाषा विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी तीन (३) वर्षांकरिता हा CHESS प्रकल्प आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सन २०१७-१८ पासून राबविण्यात आला आहे. चेस प्रकल्प पूर्वी ब्रिटिश कौन्सिल यांच्या सहकार्याने सन २०१३ ते २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ELISS (English Learning Initiative at Secondary School) या प्रकल्पांतर्गत तयार करण्यात आलेल्या ४२७ जिल्हास्तरीय आणि ४० राज्यस्तरीय Mentors च्या सहकार्याने सुरू आहे. सन २०१७-१८ पासून ते सन २०१८-१९ या कालावधीत CHESS प्रकल्पांतर्गत ५० शिक्षकांकरिता एक ETF (English Teachers' Forum) याप्रमाणे एकूण ४०८ गट साधन केंद्र/URC क्षेत्रात एकूण ४२७ English Teachers' Forum (ETF) सुरू करण्यात आले आहेत.

ETF सदस्य (लाभार्थी शिक्षक) दरमहा एकत्र येऊन स्वत:चा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास साधत आहेत. यासाठी प्राधिकरणाने उपरोक्त कालावधीत ४२७ ETF Moderators (State Resource Persons) यांना दरवर्षी राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमामधून प्रशिक्षित केले असून हे प्रशिक्षित सुलभक (MODERATORS) या शिक्षकांचे ETF च्या माध्यमातून तालुका स्तरावर सुलभीकरण करीत आहेत. त्यासाठी प्राधिकरणाने Resource Book (ETF Members Pack) तयार केले आहे. यामध्ये एकूण चार विभाग आहेत.

- Pedagogical Development of Teachers
- Linguistic Development of Teachers
- Help at Hand (Classroom Management Skills Development)
- Continuous Professional Development

प्रत्येक ETF मीटिंग नंतरही शिक्षक Social Media च्या माध्यमातून एकमेकांशी सातत्याने जोडलेले असतात. प्रत्येक ETF मीटिंगच्या माध्यमातून शिक्षकांचा चौमुखी विकास घडून येत आहे.



१६ जुलै : ऑलिम्पिकमध्ये महिला मॅरेथॉनची सुरुवात (१९८४)

अ) अध्यापनशास्त्रीय विकास

ब) स्वत:च्या भाषिक कौशल्यांचा विकास

क) अध्यापन व वर्गव्यवस्थापन विषयक तांत्रिक विकास

ड) सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास.

सर्व ETF बैठकांचे सनियंत्रण प्रकल्पांतर्गत प्रति जिल्हा एक याप्रमाणे राज्य स्तरावर KRP म्हणून काम करणारे आणि MER (Monitoring Evaluation and Reporting Team) सदस्य यांच्या मार्फत करण्यात आले आहे. बैठकांसाठी आवश्यक सर्व भौतिक सुविधा व अल्पोपाहार यांची तरतूद करण्यात आली आहे. सर्व इंग्रजी भाषेचे माध्यमिक शिक्षक एका व्यासपीठावर एकत्र येऊन मंथनातून व कृतीतून सहयोगी अध्ययन व आत्मविकास साधत आहेत.

सदर प्रकल्प तीन वर्षांसाठी असून एकूण २६ ETF बैठकांच्या माध्यमातून शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास साधण्यात आला आहे. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस वर्षभरात करावयाची कार्यवाही आणि जबाबदारी या विषयी विभागवार बैठकांचे आयोजन करून सर्व क्षेत्रीय अधिकारी व DIET अधिकारी यांचे उद्बोधन करण्यात आले आहे. संबंधित अधिकारी यांच्या दरवर्षी दोन आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. शैक्षणिक वर्षाच्या शेवटी माध्यमिक शिक्षक व ETF Moderator यांच्यासाठी जिल्हा आणि राज्यस्तरावर संगोष्टी (Symposium) चे आयोजन करण्यात आले होते.

सन २०१७-१८ मध्ये प्रत्येक English Teachers Forum(ETF) च्या एकूण ६ सहा कार्यशाळा झाल्या आहेत. सन २०१८-१९ मध्ये झालेल्या १० कार्यशाळांपैकी (बैठकांपैकी) ५ कार्यशाळा समोरासमोर (Face-to-Face) व ५ कार्यशाळा online पद्धतीने घेण्यात आल्या. याशिवाय एक Facebook Live session व एक Webinar देखील आयोजित करण्यात आले होते. सन २०१९-२० मध्ये ३ कार्यशाळा समोरासमोर (Face-to-Face) व ७ कार्यशाळा online पद्धतीने घेण्यात आल्या आहेत. याशिवाय Facebook Live session व Webinar आयोजित करण्यात आले होते.

### विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषा विकास :

सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीमधून राज्यातील सर्व अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये खालील उपक्रमांच्या माध्यमांतून विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषा कौशल्य विकास करण्यात येत आहे.

1. ENGLISH SPEAKING ECO SYSTEM
2. SATURDAY IS AN ENGLISH DAY
3. LEARNERS CLUBS
4. ONLINE COLLABORATION

### प्रकल्पाची परिणामकारकता :

प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील सुमारे १६६१८ माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजी भाषा विषयाचे अध्यापन करणारे शिक्षक आणि सुमारे ३० लाख विद्यार्थी यांचा नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या आयोजनातून इंग्रजी भाषा विकास साधण्यात येत आहे.

| Districts | Trainers | MER | BLOCK +MNC | Moderator | Teacher | Students |
|---|---|---|---|---|---|---|
| 36 | 15 | 40 | 408 | 423 | 16618 | 3000000 |

### शिक्षक :

- शिक्षकांना आपल्या अध्ययन-अध्यापनासाठी नवनवीन कल्पना, अध्ययन-अध्यापनाची तंत्रे, अध्यापनाच्या पद्धती Offline व Online पद्धतीने शिकता येत आहेत.
- बदललेल्या पाठ्यपुस्तकांचे प्रभावी अध्ययन-अध्यापन होण्यासाठी शिक्षकांना मदत होत आहे.
- शिक्षकांना समाज माध्यमांचा (Whatsapp, Twitter, Facebook, Website Forum) त्यांच्या अध्ययन-

(पृष्ठ क्र. ३५ वर)

# Multilingualism in English

**Harsha Chavan**

Regional Academic Authority, Mumbai. ◆ Mobile : 8108021815

*Teachers should use the students Multilingualism as a resource for learning, activities should be planned accordingly and opportunities should provided in a way that boost the Multilingualism which will not only help the students for personal development but also will provide with future opportunities.*

As we enter a classroom we find many students from various backgrounds. Some come from privileged classes and some come from underprivileged families. Students from rich families speak standard dialects of a language whereas children having a background of slum areas, tribal, rural, semi-town can speak a variety of languages. Thus in a classroom, one can find multiple language users. Multilingualism is a very good phenomenon which is to be discussed widely. A class where children speak different languages is called a multilingual classroom.

While teaching English as a second or third language, teachers have many challenges. Children whose mother tongue is different from English, find English very difficult due to no exposure or less exposure. But English language has received great importance not only in our country, but in other countries also.

Nowadays English is considered as a Lingua Franca. It means English is widely spoken by native and nonnative speakers of English in the world. English is also known as a language of trade and commerce. Most of the world's knowledge is available in English. Therefore, English language has been communicated importantly and growing up fast in various developed, developing and non-developed countries. Many words in English have been taken from other languages and thus it's a mixture of other languages, too. English has become a pidgin. Apart from this, English has achieved phenomenal success in code switching.

In ancient times Indians were able to interact in many languages. They could speak many languages.

We have many examples of people who were proficient in multiple languages. Our history has its remarkable example of switching people from one language to another. For example, Tamil and Sanskrit, Pali and Sanskrit, Ardhmagadhi and Sanskrit with ease. This means Multilingualism is not a recent phenomenon, it existed in the ancient time. Our Indian education system is truly multilingual in its character. For instance, Mumbai's BMC and few private schools are running with 9-10 mediums of languages, Karnataka schools are giving 14 languages options. India is a diverse country. Many languages are spoken in various states.



१८ जुलै : जीवनरसायन शास्त्रज्ञ रॉबर्ट हूक जन्मदिन (१६३५)

Marathi is used in Maharashtra, Punjabi is spoken in Punjab, Gujarati people speak Gujarati. In the northern part of India Hindi is used widely. While in South India Tamil, Kannada, Telugu languages are spoken.

As a result, Indian education system has accepted three language formulas to strengthen Multilingualism. Mother tongue as a first language, Hindi as a second language and English as a third language.

In this present world around 6000 languages have been grouped under various language families which are spoken in 200 states. This is a great example of multilingualism.

Linguist Lisa Cheng investigated the various forms of multilingualism in Europe (where more than half of Europeans speak two or more languages) from a linguistic, cognitive and sociological perspective. Somehow Multilingualism approach is more challenging in the context. To review teachers' cognition in language teaching we need to focus on the concept of 'Multilingualism' that looks at the whole linguistic repertoire. It is defined as the ability to use several languages with ease or fluency. Its origin was found with the migration of people from one place to another where they carried their languages with them.

Here language learning happens in two ways. Sometimes people aren't born multilingual but acquire one or more languages as they go about to earn bread and butter, as a result of individual circumstances one language may become the dominant language. On the other hand, people acquire new languages on their own in school or college. Being multilingual has the obvious benefit of being able to communicate with more people from different cultures. A brief survey on Multilingualism can be practiced from outsiders indicating that Canada, Belgium and Switzerland are officially declared multilingual countries.

Multilingualism is becoming a social phenomenon governed by the needs of globalization and cultural openness. Knowledge of more than two languages allows us to communicate with many people in both personal and professional contexts. When one knows the official language and perfectly speaks other languages is believed to provide an access to vast knowledge and wisdom. It provides a competitive edge in today's job market. Employers considered a more beneficial strategy of marketing besides the academic and professional credentials. Processing fluency in the desired languages helps in economic adjustments. Learning a different language always supports the knowledge the person gets from the first language.

In order to enhance multilingualism in education, foreign language should be introduced as common courses and or medium of instruction for teaching in context. The term can be categorized into different types.

- **Bilingual** : Being able to speak two languages, native and another one.
- **Trilingual** : Being able to speak three languages, native plus additional two languages
- **Polyglot** : Being able to speak multiple languages, though the number is not always specified, four or more.

- It can be categorized according to degree of acquisition, manner of acquisition.
- Sridhar (1996) classified it as individual multilingualism and social multilingualism.
- Grosjean (1982) mentioned Territorial principle and personality principle of multilingualism.
- Mansoor categorized it into Horizontal and vertical multilingualism.

Migration or labour mobility, cultural contact, annexation and colonialism, commercial, scientific, technological territorial conquest can be the reasons for multilingualism. In India every year the rate of bilingualism / multilingualism is increasing as per the census record. It is unique in itself. Several studies have convincingly demonstrated that bi/multilingual children can perform better than monolingual children. Indian scholars have shown that bilingualism is a natural state of language behaviour involved in a social group's interaction (Srivastava).

Teacher has to draw students' multilingualism as a resource for learning, plan the activities and give opportunities for students to learn in all their languages, the longer teaching and learning take place in the first language, the better the educational outcomes, translanguaging may involve in the classroom, being flexible for better involvement, modelling good behaviour relate the learning to everyday life, challenge stereotypes, group or pair work, developing range of formative assessment, creating online international community will help learners to be regular language user in any context.

Like Dua (2008) who says "as a reality it must be cultivated as a resource for enriching the human mind, development of languages, societies and cultures."

◈◈◈

---

(पृष्ठ क्र. २७ वरून)

प्रेरणादायी अभ्यासक्रम, सहकार्यात्मक वातावरण निर्मिती, शिक्षक व विद्यार्थी योग्य परस्पर संबंध यांद्वारा आध्यात्मिक बुद्धिमत्तेचा विकास करता येतो. आध्यात्मिक बुद्धिमत्तेमुळे स्वतःची जाणीव होऊन ताणरहित जीवन जगता येते. समाजातील आपले स्थान समजते, आत्मविश्वास वाढतो, सहकार्य वृत्ती, नम्रपणा, वक्तशीरपणा, उदारपणा, प्रामाणिकपणा, क्षमाशीलता या गुणांचा विकास आध्यात्मिक बुद्धिमत्तेमुळे होतो म्हणून विद्यार्थ्यांची भौतिक आणि जगाच्या ज्ञानापलीकडे जाऊन मानवी मनाचे ज्ञान घेण्याची क्षमता वाढविली पाहिजे. आध्यात्मिक बुद्धिमत्तेच्या विकासासाठी प्रत्यक्ष कृती व सराव महत्त्वाचा आहे. आध्यात्मिक दृष्टी ही इतरांमध्ये फक्त उत्कृष्ट (Only best) पाहते. त्यामुळे इतरांना उत्कृष्टतेचा विकास करण्यासाठी शक्ती मिळते. इतरांकडे पाहण्याची ही दृष्टीच विद्यार्थ्यांना शिकविली गेली, तर उत्कृष्ट गुणवत्तेची ऊर्जा त्यांच्यात निर्माण होईल.

अशाप्रकारे बुद्धिमत्ता, भावनिक बुद्धिमत्ता व आध्यात्मिक बुद्धिमत्ता यांचे उपयोजन अध्ययन–अध्यापनात केल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल व एकंदरीत संतुलित व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी नक्कीच मदत होईल.

◈◈◈



१८ जुलै : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन (१९६९)

# इच्छाशक्ती तेथे मार्ग

**मंगेश देशपांडे**

विस्तार अधिकारी (शिक्षण), पं. स. बाभुळगाव. ◆ भ्रमणध्वनी : ८९७५३८७९७९

*पहिलीचा वर्ग! आईचे बोट सोडून शाळेत शिरताना धास्तावलेल्या चिमुकल्यांचे हसून, प्रेमाने स्वागत करत त्यांचे मन जिंकून घेणे जमले की, पुढचा सगळा प्रवास आनंदाचा; पण हे जमले नाही तर मात्र गोंधळ! न आवरता येणारा. हा गोंधळ पाहून 'माझे मन वर्गात रमले नाही' हे अधिकाऱ्यांचे उद्‌गार एका शिक्षकांना फार बोचले आणि मग त्या शिक्षकांनी मुलाची आई बनून वर्ग असा काही तयार केला की, त्यांचा पहिलीचा वर्ग इतरांसाठी प्रेरणास्रोत ठरला त्याविषयी...*

गेली पाच वर्षे हिंगणघाट येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून व्यतीत केल्यानंतर मी नुकताच पंचायत समिती, बाभुळगाव येथे रुजू झालो. मला शाळा भेटीचा प्रचंड नाद! अधाश्यासारखा शाळा पाहत सुटलो. असाच एकेदिवशी शाळा भेट करताना तालुक्यापासूनच ५-७ कि. मी अंतरावर असलेल्या राणी अमरावती शाळेत पोहोचलो. एकामागून एक वर्ग पाहता पाहता पहिलीच्या वर्गात शिरलो. मुले वर्गात धिंगाणा घालत होती. साहित्य वर्गात इतस्तत: पसरलेले होते. एक साधारण मध्यम वयोगटातील शिक्षक काहीसे घाबरत, 'अरे, गुड आफ्टरनून म्हणा ना' अशी विद्यार्थ्यांना सूचना देऊ लागले. पहिलीचा वर्ग तो! कुणी कुणाचे ऐकायच्या मूडमध्ये नव्हते. सगळे आपल्याच मस्तीत मश्गुल. सर ओशाळले. मी लगेच जुजबी प्रश्न विचारले, पण कोणत्याच प्रश्नाचे उत्तर मुलांना आले नाही. ''सर, मुले बोलत नाहीत, मुले धीट असायला हवीत. येते का रे मुलांनो एखादे बडबडगीत?'' वर्ग चिडीचूप. ''सर, पुढच्या भेटीत मला बोलका वर्ग हवा आहे, तयारी करा, मी पुन्हा येईन'' असे म्हटले आणि निघालो तडक दुसऱ्या वर्गाकडे.

पहिलीचा वर्ग कसा असावा याचा मनाशी विचार करू लागलो. अगदी निरागस, निष्पाप मुले. कोणतेही ओझे नाही, भीती नाही. शिक्षकांच्या अंगाखांद्यावर खेळणारी. खरे म्हणजे या वर्गाच्या शिक्षकाने आई सारखेच असायला हवे. सर्वांत पहिली पायरी म्हणजे बालकांच्या मानसशास्त्राचा अभ्यास प्रत्येक शिक्षकाने करायला हवा. इयत्ता पहिलीच्या अभ्यासक्रमाचा जर आपण बारकाईने अभ्यास केला, तर पहिले काही दिवस वर्गाच्या दाराशी उभे राहून मुलांचे स्वागत केले, हसून आनंदाने बोललो आणि त्यांच्याशी सुसंवाद साधला तर त्यांचा लाजरेपणा, बुजरेपणा, भीती कमी होईल. शाळेत त्यांना सुरक्षित वाटेल. शाळेविषयी गोडी निर्माण होईल. इयत्ता पहिलीचा वर्ग फळे, फुले, पाने, वस्तू यांनी सुशोभित केलेला असावा. मुलांना आवडणारी, भावणारी चित्रे, खेळणी इत्यादी साहित्य त्यात असावे, मुलांना त्यांच्या घराविषयी, पालकांविषयी, कुटुंबाविषयी प्रश्न विचारावेत. एकूणच आपले मन आणि मनातील गोष्टी शिक्षकांजवळ व्यक्त कराव्या असे त्यांना वाटायला हवे.

दिवसातील २४ तासांपैकी मुले ५ ते ६ तास शाळेत असतात. उरलेले सर्व तास ते शाळेबाहेरील बिनभिंतींच्या शाळेत असतात. त्यांची उत्सुक मने आजूबाजूंच्या घटनांतून, निरीक्षणांतून सगळे टिपून घेत असतात शिक्षण म्हणजे तरी नेमके काय आहे? जगण्यासाठी ज्या ज्या गोष्टी कराव्या लागतात त्या करता येणे आणि त्यात

कौशल्य मिळविणे म्हणजे शिक्षण. लेखन, वाचन, सामान्य ज्ञान आणि भाषा हा सुद्धा त्यातीलच एक भाग, पण हे करण्यासाठी त्यांचे अवधान टिकणे, एका जागी स्थिर बसून मन एकाग्र होणे महत्त्वाचे. लहान मुलांचे अवधान १० ते १५ मिनिटांच्या वर टिकत नाही हे शास्त्रीय दृष्ट्या देखील सिद्ध झाले आहे.

मी जेव्हा सर्वप्रथम इयत्ता पहिलीच्या भोजराज खडसे सरांच्या वर्गात गेलो तेव्हा मला यातले काहीही दिसून आले नाही. मी मनोमन नाराज झालो. सरांनी माझे भाव न्याहाळले. साधारणत: त्यानंतर ३ ते ४ महिन्यांनी मी त्याच शाळेत नोव्हेंबर महिन्यात शाळाभेटीला गेलो. त्या शाळेतील शिक्षिका नम्रता खडसे यांनी मला आणि माझ्या सोबत असलेल्या गटशिक्षणाधिकारी साहेबांना त्यांच्या वर्गात नेले. मुलांचा नि आमचा इंग्रजी संवाद घडवून आणला. खूप छान वाटले. तेवढ्यात खडसे मॅडम म्हणाल्या, ''सर हा आमच्या शाळेतील चमत्कार बघा, भोजराज खडसे सरांचा पहिलीचा वर्ग तर बघा!'' आणि मी थांबून निरीक्षण करू लागलो, माझ्या मागच्या भेटीतील वर्ग आणि आजचा वर्ग यात कमालीचा फरक जाणवत होता. वर्गाच्या मधोमध सर्व मुले घोळका करून सरांच्या भोवती बसलेली होती. वर्गातील भिंतींवर शब्दपट्ट्या, वाक्यपट्ट्या, उतारे, मुळाक्षरे, चित्रे लावलेली होती. मण्यांच्या माळा, धूळपाटी इ. सर्वच शैक्षणिक साहित्य मांडलेले होते. मी त्यांच्यासोबत बसलो. सर म्हणाले, ''साहेब विचारा माझ्या मुलांना, बोला मुलांशी.'' मी मग प्रत्येकाच्या जवळ बसून शब्दवाचन, वाक्यवाचन कसे करतात ते पाहिले. माझ्यासाठी तो आश्चर्याचा धक्काच होता. पहिल्या भेटीत न्याहाळलेली हीच का ती मुले! सत्तावीस विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थ्यांची प्रगती जोडाक्षरे वाचनापर्यंत होती. मी विचारले, ''ही कोणती जादूची कांडी फिरवलीत सर? इयत्ता पहिलीच्या ज्या क्षमता सप्टेंबर महिन्यात यायला हव्यात त्याच्या कितीतरी पट जास्त पुढे ही मुले आहेत.'' सर नम्रपणे म्हणाले, ''मी यांना सांकेतिक भाषेतून शिकवितो, स्वर, व्यंजने, काना–मात्रा, उच्चार, अनुस्वार, जोडचिन्हे या सर्व अक्षरांच्या अवयवांना आम्ही सांकेतिक रूप दिले आणि सोबत सांगीतिक लय सुद्धा दिली. अक्षरे गिरवीत असताना विद्यार्थी माझ्याबरोबर म्हणतात आणि सांकेतिक कृती देखील करतात. एकदा हे अक्षरांचे अवयव आणि त्यांचे सांकेतिक रूप डोक्यात बसले व त्याची कृती करता आली की भाषा सोपी होते.''

भाषेप्रमाणेच गणितातील अंकांनाही सरांनी सांकेतिक रूप दिले. मग काय, माझ्यासमोर वर्गातील विद्यार्थ्यांनी सांकेतिक लिपीवरून शब्द ओळखले आणि वर्ग, नम्रता, मृत्यू, राष्ट्रगीत, धृतराष्ट्र, वर्तमानपत्र, वर्धा, आश्चर्य, संस्कृती, अंतरंग यांसारखे जोडाक्षरे असलेले शब्द वहीत लिहून दाखविले. त्याचबरोबर दोन अंकी कोणत्याही संख्याचे लेखन व वाचन मुले सहजगत्या करीत होती. मी त्यांना वर्गात उपलब्ध असलेले वर्तमानपत्र वाचावयास दिले. मुलांनी ते धडाधडा स्पष्टपणे वाचून दाखविले. या यशाचे गमक काय? तर पूर्ण वेळ मुलांना देणे, विद्यार्थ्यांना आवडणाऱ्या पद्धतीने, तंत्राने शिकविणे, आस्थेने, मायेने त्यांच्याशी वागणे व मुख्य म्हणजे त्यांची आई होणे! हे जमले की, असा वर्ग तयार होतो. या वर्गातील विद्यार्थी अगदी घरी असल्यासारखे वर्गात वावरत होते. त्यांच्यात कमालीचा आत्मविश्वास होता. मुले चुटूचुटू बोलत होती. भीती नावाची गोष्ट त्यांच्या गावी नव्हतीच मुळी! विद्यार्थ्यांनी मग इंग्रजीमधील Rhymes म्हणून दाखविल्या. इंग्रजी अक्षरे (Alphabets) ओळखली. इंग्रजी शब्दपट्ट्यांचे वाचन केले. इंग्रजीतील वर्ग सूचनांचे पालन केले. या वर्गातील वातावरणाने मी स्तिमित झालो. सरांचे व विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक करून मी परतलो. आजच्या वर्गभेटीने मला एका वेगळ्याच सुखाची अनुभूती आली होती. खरेच किती कठीण आहे पहिला


१८ जुलै : रोहिणी उपग्रहाचे अवकाशात प्रक्षेपण (१९८०)

वर्ग घडविणे, आणि तो तयार करणे. खडसे सरांच्या वर्गाची भेट माझ्यासाठी विलक्षण होती. असे म्हणतात ना, No Method is Greater than Teachers. सरांनी वर्ग अध्यापनाची एक नवी शैली स्वत: तयार केली होती. या तंत्राची ओळख सर्वांना व्हावी म्हणून मी, बीटातील इयत्ता पहिलीला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांची कार्यशाळा खडसे सरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्याच वर्गात घेतली. नकारात्मक कारणे सांगणाऱ्या शिक्षकांसाठी खडसे सरांचा पहिला वर्ग हा प्रेरणास्रोत ठरला. तालुक्यातील विविध केंद्रात खडसे सरांनी इयत्ता पहिलीच्या वर्गाच्या गुणवत्तेचे सादरीकरण करीत सर्वांची मने जिंकली.

एकूण काय की, 'सर माझे या वर्गात मन रमले नाही' या माझ्या एका वाक्याने खडसे सरांच्या मनात प्रचंड उलथापालथ झाली आणि पुढच्याच भेटीत हा आमूलाग्र बदल झालेला माझ्या निदर्शनास आला. इच्छाशक्ती आणि ध्यास घेतला की, काहीही अशक्य नाही याची प्रचिती आली. सरांच्या बदललेल्या वर्गाकडे पाहून माझ्या मनात आले,

*यशस्वी माणसे आपल्या यशासाठी किंवा अपयशासाठी परिस्थितीला, माणसांना, नशिबाला दोष देत नाहीत, तर ते स्वत: प्रयत्न करतात आणि यशस्वी होतात...*

◈◈◈

---

**(पृष्ठ क्र. २९ वरून)**

अध्यापन प्रक्रियेत कसा प्रभावी वापर करावा याची सहज व उपयुक्त माहिती मिळत आहे.

- Members Pack च्या साहाय्याने शिक्षकांना स्वतः चे इंग्रजी समृद्ध करण्यासाठी यातून संधी मिळाली आहे व त्यांना इंग्रजी बोलण्यासाठी ETF च्या माध्यमातून एक प्लॅटफॉर्म मिळत आहे.
- शिक्षकांना या प्रकल्पाच्या माध्यमातून विविध संधी स्रोत उपलब्ध झाल्याने शिक्षकांचे इंग्रजी भाषेचे वर्ग अध्यापन सुधारले आहे किंबहुना त्यांचे अध्यापन अद्ययावत करण्याची संधी त्यांना मिळत आहे.

## विद्यार्थी :

राज्यातील विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प इंग्रजी अध्ययनाची नवचेतना घेऊन आलेला आहे. या प्रकल्पाने –

- इयत्ता नववी व दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना वैयक्तिकपणे, त्यांच्या सोबत्यांबरोबर अध्ययन (Pair work) आणि गट कार्य (Group Work) अशा वेगवेगळ्या वर्ग–आंतरक्रियेतून शिकायला मिळत आहे.
- इंग्रजी विषयासाठी शाळेत Saturday is an English Day आयोजित केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्माण झाली व विद्यार्थी वेगवेगळ्या Activities मध्ये सहभागी झाल्यामुळे त्यांना इंग्रजी विषय नव्या पद्धतीने शिकायला मिळू लागला आहे.
- सर्व शाळांमध्ये Learners Club च्या माध्यमातून इंग्रजी संभाषण करण्याची संधी देखील प्राप्त होत आहे.
- मुलांना शासनाच्या शाळेतही इंग्रजी शिकण्याची रंजक व नवी संधी मिळाल्याने शाळांचा पट वाढण्यात या प्रकल्पाची विशेष मदत होताना दिसत आहे.
- मुले इंग्रजीतील Activities करीत असल्याने त्यांची इंग्रजी बाबतची भीती दूर झाली आहे व त्यांच्यात इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास आला आहे.

◈◈◈

# ...आणि मुले प्रेरित झाली

**मधुकर येसणे**

विद्या मंदिर लिंगनूर, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर. ◆ भ्रमणध्वनी : ९९२२४९६२१०

*वर्गात काही मोजके विद्यार्थी असे असतात की, त्यांना कशातच रस नसतो. शिक्षकांचे सगळे प्रयत्न ते हाणून पाडतात. त्यांना अध्ययनाची गोडी लावणे हे फार मोठे आव्हान असते. मुळात मुले चांगलीच असतात; गरज असते योग्य वेळी त्यांना प्रेरणा मिळण्याची. अशी प्रेरणा मिळाली तर आपणही काहीतरी चांगलं करावं असं त्यांना आतून वाटायला लागतं. असं आतून वाटणं झालं की काम सोपं होतं. लिंगनूरच्या शाळेतल्या मुलांच्या बाबतीतही असंच घडलं आणि मग शिक्षकांचे प्रयत्न कसे सार्थकी लागले त्याविषयी...*

लिंगनूर, हे गडहिंग्लज तालुक्यातील एक छोटेसे गाव. गावातील बहुसंख्य लोक शेती आणि इतर कामावर उदरनिर्वाह करणारे. जीवनाची लढाई लढत मुलांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देणारे पालक. वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊन येथील मुलांनी शाळेच्या आणि आपल्या गावाच्या नावलौकिकात भर टाकलेली. शाळेने प्रश्नमंजूषा, सामान्यज्ञान स्पर्धा, प्रज्ञाशोध परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, सांस्कृतिक स्पर्धा तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये नावलौकिक मिळविला आहे. बालकवी संमेलन, नावीन्यपूर्ण इंग्रजी परिपाठ, मानवी मनोरे व कसरती, बिस्किट प्रश्न असे विविध उपक्रम राबवून शाळेने आपले वेगळेपण जपले आहे. ही झाली एक बाजू, पण काही मुले शैक्षणिक प्रगतीत मागासलेली आहेत. शाळेतील इतर प्रगत मुलांच्या बरोबर ही मुले सुद्धा प्रगत व्हावीत यासाठी जोरदार प्रयत्न करूनही फारसे यश येत नव्हते. ही मुले सुधारावीत यासाठी खूप सारे प्रयत्न केले.

### या मुलांचा विकास व्हावा यासाठी :

१) शैक्षणिक साहित्याचा पुरवठा केला. २) मुलांना मार्गदर्शन आणि समुपदेशन केले. ३) पालकांच्या भेटी घेऊन त्यांचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला. ४) मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी व्हॉट्सअॅप ग्रुपची निर्मिती केली. ५) मुलांचा अभ्यास पाहण्यासाठी गृहभेटी दिल्या. ६) रात्र अभ्यासिकेचे आयोजन केले. ७) या मुलांनी केलेल्या साध्या कृतींचेही कौतुक केले. ८) शेवटी कठोर शब्दांत त्यांची कानउघाडणीही केली, पण या कशाचाही परिणाम मुलांच्या प्रगतीवर दिसून आला नाही. व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सहभागी होण्यासाठी या मुलांकडून मोबाईल नंबर सुद्धा उपलब्ध झाले नाहीत. पालकांनी समजावून सांगून सुद्धा या मुलांचा प्रतिसाद मिळाला नाही. रात्र अभ्यासिकेमध्ये या मुलांची सतत अनुपस्थिती असायची.

इतके सारे प्रयत्न करूनही या मुलांवर कोणताही परिणाम झाला नाही. या मुलांची मानसिकता बदलण्यात अपेक्षित यश आले नाही. कितीही प्रयत्न केला तरी या मुलांमध्ये सुधारणा होणार नाही असे वाटू लागले, पण 'परिस्थितीसमोर हार मानेल तो शिक्षक कसला?' आम्ही आमचे प्रयत्न थांबविले नाहीत. हे विद्यार्थी शारीरिक दृष्ट्या सक्षम आहेत. या मुलांनी मनावर घेतले तर ही मुले सुद्धा प्रगत होऊ शकतात यावर माझा ठाम विश्वास होता आणि म्हणून मी दररोज नव्या उमेदीने विचार करीत होतो. मुलांनी स्वतः ठरविल्याशिवाय त्यांच्यात बदल होणार नाही असे माझे ठाम मत झाले.

मार्च महिना सुरू झाला. शैक्षणिक वर्ष संपायला



२२ जुलै : तिरंगी झेंड्याची राष्ट्रध्वज म्हणून स्वीकृती (१९४७)

आले आणि याच वेळी देशभर कोरोनाने थैमान घातले. शाळांना सक्तीच्या सुट्ट्या दिल्या गेल्या. कोरोना विषाणूला तोंड देण्यासाठी शासनाने देशभर लॉकडाऊन जाहीर केला. आमच्याही गावची ग्रामपंचायत सक्रिय झाली. नागरिकांनी घरातून बाहेर पडू नये यासाठी आवाहन केले जाऊ लागले. मुलांच्या अभ्यासात खंड पडू नये म्हणून वर्गवार व्हॉट्सॲप ग्रुपची निर्मिती केली. ग्रुपवरून मुलांना अभ्यास दिला जाऊ लागला. विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने आवश्यक माहिती ग्रुपवर पाठविली जाऊ लागली. प्रत्येक विषयाच्या प्रश्नपत्रिका, सामान्यज्ञानावर आधारित आजचे प्रश्न ग्रुपवर पाठविले. व्हॉट्सॲप वरील अभ्यासात मुलांची रुची वाढू लागली. शाळांना सुट्टी असूनही विद्यार्थी शिक्षकांच्या संपर्कात राहिले. त्या विद्यार्थ्यांचे पालक आपल्या मुलांना विचारू लागले, 'इतर मुले व्हॉट्सॲप वरून अभ्यास करीत आहेत आणि तू का अभ्यास करीत नाहीस?'

याच वेळी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी मा. आशा उबाळे मॅडम यांनी Study from Home हा उपक्रम सुरू केला. या उपक्रमातून नामवंत शिक्षकांनी तयार केलेल्या प्रश्नपत्रिका मुलांना मिळू लागल्या. त्या प्रश्नपत्रिकाही मुले आवडीने सोडवू लागली.

शिक्षक व्हॉट्सॲप ग्रुपवरून मुलांचा अभ्यास घेत आहेत, याची चर्चा गावातील नागरिकांमध्ये होऊ लागली. मुले अभ्यासासाठी पालकांकडून मोबाईलची मागणी करू लागली. मुलांना अभ्यासासाठी मोबाईल द्यायचा आहे म्हणून पालक मित्रपरिवारातील गप्पा सोडून घरी परतू लागले. मात्र या साऱ्यांचा परिणाम आमच्या 'त्या' मुलांवर दिसून येत नव्हता. हे विद्यार्थी ग्रुपमध्ये सामील नसल्यामुळे ग्रुपवरील कृती आणि अभ्यासापासून दूर होते. घरातच थांबून रहावे लागल्यामुळे त्यांच्यापुढे अनेक प्रश्न निर्माण झाले.

(१) वेळ कसा घालवावा समजेना. (२) टी. व्ही. चा अतिवापर होऊ लागला. (३) भावंडांमध्ये वाद निर्माण होऊ लागले. (४) भांडणामुळे पालकांना मानसिक त्रास होऊ लागला. (५) मुलांना पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. (६) मुले घरी राहून कंटाळली. (७) मुलांचा मानसिक कोंडमारा होऊ लागला.

आपले वर्गमित्र घरातच राहून अभ्यासात गुंतून गेले आहेत हे त्यांना कळत होते. ग्रुपवरील अभ्यासामुळे गुरुजन आणि इतरांकडून मित्रांचे होणारे कौतुक व चर्चा यांतून 'गड्यांनो आपला अभ्यास बरा' ही भावना मुलांमध्ये निर्माण झाली. इतर मुले व्हॉट्सॲपवर येणाऱ्या प्रश्नपत्रिका सोडवीत आहेत. आपणही प्रश्नपत्रिका सोडवाव्यात अशी इच्छा मुलांच्या मनामध्ये निर्माण झाली. त्याचा परिणाम असा झाला की...

(१) मुले फोन करून आपल्याला व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सामील करून घेण्यासाठी विनंती करू लागली. (२) आपणहून मोबाईल नंबर देऊन प्रश्नपत्रिका पाठविण्याची विनंती करू लागली. (३) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी मुले अभ्यासाबरोबरच इतरांची मदत घेऊ लागली. (४) सोडविलेल्या प्रश्नपत्रिका व्हॉट्सॲपवर पाठविल्यावर आपल्याला किती गुण प्राप्त झाले, हे ऐकण्यास उत्सुक दिसू लागली. (५) प्रश्नपत्रिका सोडविण्यातील मुलांचा नियमितपणा वाढला.

प्रवाहातून बाहेर पडू पाहणारी मुले प्रेरित झाली आणि अभ्यासात गुंतून गेली, ही घटनाच माझा आनंद द्विगुणित करणारी आहे. त्यांचा हा उत्साह कायमस्वरूपी टिकून रहावा हीच सदिच्छा!

कोणतेही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संबंधित घटक प्रेरित होणे अतिशय महत्त्वाचे असते. ही प्रेरणा निर्माण करणे हे आम्हां गुरुजनांचे कर्तव्यच आहे.

◈◈◈

# कविता रचू या, कवितेतून शिकू या!

**लक्ष्मण नरुटे**

जि. प. प्राथ. शाळा वानवली अहिरे, जि. सातारा. भ्रमणध्वनी ◆ ९८६०४१२९८७

*लहान मुलांना शाळेत खेळाचा तास फार आवडतो, तसेच आणखी एक गोष्ट आवडते; ती म्हणजे कविता म्हणणे. संपूर्ण वर्ग, मोठ्या आवाजात चालीवर कविता म्हणण्यात रंगून गेलेला पाहिला की, तुम्हांला याची नक्की प्रचिती येईल. कविता म्हणता म्हणता कविता करण्याची गोडी लागली तर..... कवितेवर प्रेम असणाऱ्या शिक्षकांनी मुलांना कविता रचण्याची गोडी लावली त्याविषयी...*

जून २०१८ मध्ये माझी बदली सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यात वानवली अहिरे या दुर्गम गावातील शाळेत झाली.

आमची शाळा म्हणजे निसर्गरम्य सुंदर परिसराने वेढलेली. अशा निसर्गरम्य वातावरणात माझी काव्यलेखनाची आवड मला गप्प बसू देणे शक्यच नव्हते. आमच्या शाळेचा इयत्ता पहिली ते पाचवीचा एकूण पट ८. मग मी ठरविले ही आवड शाळेतील मुलांमध्ये रुजवायची. आमच्या तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी आणि आमचे वेळापूर केंद्राचे केंद्रप्रमुख हे दोघेही अधिकारी कविमनाचे असल्यामुळे 'चला कवितेतून शिकू या' या उपक्रमास त्यांनी प्रोत्साहन दिले. उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली.

दररोज शाळेच्या परिपाठामध्ये मुलांना मी पाच शब्द सांगतो. शब्दांशी यमक जुळणारे शब्द मुलांनी सांगायचे उदा. ससा-मासा, राणी-गाणी. मुलांना शाळेमध्ये मराठी शब्दकोश मी उपलब्ध करून दिला आहे. तसेच विविध बालगीतांची पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे मुलांचे अवांतर वाचन वाढले. त्यांचा शब्दसंग्रह विकसित झाला.

शाळेत दर शनिवारी मी मुलांना कवितेसाठी सोपा विषय देत असे व मुलांकडून चारोळ्या व कविता तयार करून घेत असे. मुलेही मनाने तोडक्या-मोडक्या पण स्वतःच्या भाषेत कविता लिहू लागली आणि त्यांना आपणही कविता लिहू शकतो याचा आनंद मिळू लागला. चांगल्या कविता लिहिणाऱ्यांना बक्षीस देऊ लागलो. ससा, आई अशा विषयांवर मुले कविता रचू लागली

ससा रे ससा, तू भित्रा कसा
तो बघ मासा, पाण्यात पोहतो कसा.

जगावेगळी आहे प्रेमळ माझी आई
सगळ्यांची कामे करण्यात वेळ तिचा जाई.

अशा छोट्या छोट्या रचना मुले तयार करू लागली, मग मी ठरविले की, या कवितेच्या माध्यमातून प्रत्येक मुलामध्ये अभ्यासाच्या सर्व विषयांची गोडी निर्माण करायची.

**मग गणित शिकविताना :**

दहातून पाच घालवा, बघा राहिले पाच
वजाबाकी आली बरोबर, चला करू या नाच

**इंग्रजी शिकविताना :**

ए फॉर ॲपल, बी फॉर बॅट
देअर इज अ डॉग, निअर दि कॅट

**परिसर अभ्यास शिकविताना**

दररोज अंघोळ करू, वेळेवर नखे कापू,
शाळेचा अभ्यास करून, रात्री लवकर झोपू.

अशा प्रकारच्या छोट्या छोट्या कविता मी अध्यापनात नेहमीच वापरू लागलो. त्यामुळे मुलांना अध्ययनात गोडी निर्माण झाली.

**(पृष्ठ क्र. ४१ वर)**



२३ जुलै : चंद्रशेखर आझाद जन्मदिन (१९०६)

# शिष्यवृत्तीचा सोनाळी पॅटर्न

**मारुती देवेकर**

विद्या मंदिर सोनाळी (गारगोटी), ता. भुदरगड, जि. कोल्हापूर. ◆ भ्रमणध्वनी : ८००७७१९८६३

*प्राथमिक शिक्षणात शिष्यवृत्ती परीक्षा ही विशेष समजली जाते. ही परीक्षा म्हणजे स्पर्धा परीक्षांचा पाया. शाळेतील शिष्यवृत्ती धारकांची संख्या शाळेच्या लौकिकात भर टाकते म्हणूनच या परीक्षेच्या तयारीसाठी शिक्षक, विद्यार्थी व पालक प्रयत्नांची पराकाष्ठा करतात असेच प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांनी शिष्यवृत्तीतील यशाने अनुभवले परमोच्च आनंदाचे क्षण. त्यांच्या अनुभवाविषयी...*

'भुदरगड' ची ओळख 'शिष्यवृत्तीचे माहेरघर' अशी आहे. संपूर्ण राज्यात भुदरगडने शिष्यवृत्ती परीक्षेत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करून गुणवत्तेत आगळावेगळा ठसा उमटविला आहे. संपूर्ण महाराष्ट्रासाठी भुदरगड शिष्यवृत्ती पॅटर्न 'मैलाचा दगड' ठरला आहे. तालुक्यातील अनेक शिक्षक शिष्यवृत्ती मार्गदर्शनासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर पोहोचले आहेत. तालुक्याची ही ओळख निर्माण करण्यासाठी येथील शिक्षक दिवसरात्र काम करताना अजिबात थकत नाहीत. यशाने हुरळून जात नाहीत. येथील शिक्षक स्वंयप्रेरणेने शिष्यवृत्तीकामी झोकून देऊन काम करतात. रविवार अथवा सुट्टीचे दिवस त्यांच्या लक्षातही नसतात. हे ध्येयवेडे शिक्षक विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी अखंड प्रयत्न करीत असतात. त्यांच्या डोक्यात सदोदित शिष्यवृत्ती असते. शिष्यवृत्तीची ही यशोगाथा प्रसार माध्यमांद्वारे सर्वदूर पोहोचली आहे.




### एक पाऊल शिष्यवृत्तीच्या दिशेने :

अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून गुणवत्तेत अग्रेसर ठरलेल्या 'शिंदेवाडी', ता. भुदरगड या नावाजलेल्या 'बिनघंटेच्या' शाळेमधून जून २०१६ मध्ये मी प्रशासकीय बदलीने विद्यामंदिर सोनाळी शाळेत रुजू झालो. ही शाळा तालुक्याच्या ठिकाणी असणारी. ग्रामीण विद्यापीठ अशी गारगोटीची ओळख. 'शिक्षणपंढरी' म्हणून गारगोटीची महाराष्ट्रभर ख्याती. या शिक्षणपंढरीत मराठी व इंग्रजी माध्यमांच्या असंख्य शाळा, खाजगी माध्यमांच्या नामवंत शाळा, नजीकच आंतरराष्ट्रीय ओजस शाळा. या शाळांच्या स्पर्धेत सदर शाळेची पटसंख्या वाढविणे व टिकविणे म्हणजे तारेवरची कसरत. अशा परिस्थितीत गुणवत्तेच्या जोरावरच शाळेची ओळख निर्माण करण्याचा चंग बांधला आणि सुरू झाला शिष्यवृत्ती तयारीचा प्रवास...

### शिष्यवृत्ती परीक्षेसाठी 'प्रज्ञाशोध' ठरली दीपस्तंभ :

तालुक्याचे तत्कालीन गटशिक्षणाधिकारी मा. संपत गायकवाड यांच्या संकल्पनेतून भुदरगड प्रज्ञाशोध परीक्षा (B.T.S.) इयत्ता पहिली व दुसरी साठी सुरू झाली. तसेच

आपल्या जि. प. शाळेनेही नुकतीच इयत्ता चौथीसाठी प्रज्ञाशोध परीक्षा सुरू केली. या दोन्ही परीक्षांच्या तयारीमुळे पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेचा पाया आपसूकच रचला गेला. त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी 'प्रज्ञाशोध' परीक्षा दीपस्तंभ ठरली.

### नियोजन व कार्यवाही :

'यश हे प्रयत्नांना चिकटलेले असते.' हे लक्षात ठेवून माझ्या स्वप्नातील यश मला मिळवायचे होते. त्यामुळे आवश्यक तितके 'समयदान' करून शाळा शिष्यवृत्तीत 'टॉप' आणायची यादृष्टीने मी योग्य ते नियोजन केले.

१९ एप्रिल २०१८ पासून पाचवीच्या शिष्यवृत्तीची तयारी सुरू केली. जुलै अखेर पाठ्यक्रम संपवून शिष्यवृत्ती अभ्यासक्रम शिकविण्यास सुरुवात केली. 'शिष्यवृत्ती' हा एक वेगळा प्रवास आहे. या प्रवासाचा रस्ता वेगळा आहे. गाठायचे ठिकाण वेगळे आहे. यामागे निश्चित, ठाम विचार आहे. विद्यार्थी या परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावेत म्हणून मी १ नोव्हेंबर २०१८ पासून दररोज सराव प्रश्नपत्रिका सोडविण्यावर भर दिला. साधारण ११७ प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतल्या. त्याचा अंतिम परीक्षेत विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा झाला.

### अभ्यासाचे वेळापत्रक :

यशापर्यंत पोहोचण्याचा योग्य मार्ग म्हणजे अभ्यासाचे सूक्ष्म नियोजन. मी यासाठी सुरुवातीपासूनच विद्यार्थी वाचनाचे योग्य वेळापत्रक बनविले, ज्यामुळे सर्व घटकांना व सर्व विषयांना योग्य न्याय देता आला. सकाळ सत्रात भाषा व इंग्रजी या विषयांच्या वाचनावर भर दिला. सायंकाळी गणित व परिसर अभ्यास या विषयांचा बारकाईने अभ्यास घेऊन मुक्तचर्चा झाल्यावरच वर्ग सोडला जायचा.

### चुकांची दुरुस्ती व मार्गदर्शन :

विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या सराव प्रश्नपत्रिका बारकाईने तपासून विद्यार्थ्यांना त्यांच्या चुका निदर्शनास आणून दिल्या. ज्या घटकांवरील प्रश्न वारंवार चुकतात तेथे विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून ते घटक दृढ करून घेतले. चुका होणारे घटक विद्यार्थ्यांना पुन्हा पुन्हा शिकवून त्यातील बारकावे त्यांच्या लक्षात आणून दिले.

### इतर शिक्षकांचे मार्गदर्शन :

आमच्या तालुक्यातील इतर शाळांमधील शिष्यवृत्ती परीक्षेच्या उत्कृष्ट मार्गदर्शकांना शाळेत बोलावून त्यांना त्यांच्या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास सांगितले. त्या शिक्षकांनी आपला विषय रंजक पद्धतीने, सोप्या व सुटसुटीत भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. विद्यार्थ्यांच्या शंका व समस्यांचे समाधान केले. या गोष्टींचा विद्यार्थ्यांना खूप फायदा झाला.

### प्रश्नांच्या आकलनावर भर :

बरेच विद्यार्थी प्रश्न समजून न घेतल्यामुळे म्हणजेच आकलनाअभावी वारंवार चुका करायचे. त्यासाठी प्रश्नांचे योग्य पद्धतीने वाचन करण्यावर भर दिला. योग्य पर्याय निवडण्यासाठी वेगळी योजना आखल्याने चुका कमी होण्यास मदत झाली.

### एकाग्रतेला प्राधान्य :

उत्तुंग यश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी जिद्द, आत्मविश्वास व एकाग्रता ही त्रिसूत्री असणे अत्यावश्यक आहे म्हणूनच मी अभ्यासास सुरुवात करण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे अवधान टिकविण्यासाठी त्यांच्या एकाग्रतेवर लक्ष केंद्रित केले. सराव पेपर सोडविण्यापूर्वी डोळे मिटून ध्यानस्थ बसण्याची सवय लावली. त्यामुळे विद्यार्थी एकाग्र होण्यास नक्कीच मदत झाली.

### विद्यार्थ्यांच्या आहार-आरोग्याकडे लक्ष :

यश प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याबरोबरच मी त्यांचा दैनंदिन आहार, आरोग्य व शारीरिक तंदुरुस्तीकडे विशेष लक्ष दिले. विद्यार्थी नेहमी प्रसन्न, प्रफुल्लित व आनंददायी राहतील यासाठी मी त्यांच्या आरोग्याकडेही लक्ष केंद्रित केले. अभ्यासाचा ताणतणाव जाणवू नये व शरीर आणि मन ताजेतवाने


२५ जुलै : ज्येष्ठ कवी वसंत बापट जन्मदिन (१९२२)

रहावे यासाठी सायंकाळी दीड तास मी त्यांना मैदानावर घेऊन जायचो. मी सुद्‌धा त्यांच्याबरोबर खेळायचो. विद्यार्थी खेळाबरोबर नियमित आठ तास झोपतील याकडे लक्ष देण्यासाठी पालकांना सतर्क केले. 'सुजाण पालक' या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपच्या माध्यमातून पालकांशी सतत संपर्कात रहायचो. विद्यार्थ्यांना प्रोटीनयुक्त आहार देण्यासंदर्भात पालकांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. सर्वच पालकांनी घरातील टी.व्ही. ला पूर्ण वर्षभर विश्रांती दिली होती. विद्यार्थ्यांना टी.व्ही. पासून दूर ठेवले गेले.

### मी न माझा राहिलो :

सन २०१८-१९ मधील शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घेताना मी वर्षभर शाळा सुरू ठेवली आणि त्यामुळेच शिष्यवृत्तीच्या परीक्षेत शाळा जिल्ह्यात अग्रेसर ठरली. उच्चांकी व नेत्रदीपक यश शाळेने मिळविले. ३ विद्यार्थी राज्य स्तरावर तर ५ विद्यार्थी जिल्हा स्तरावर गुणवत्ता निवड यादीत स्थान मिळवू शकले. हे देदीप्यमान यश पाहून मी माझा राहिलो नाही. वर्षभर मी आणि माझे विद्यार्थी त्या दिवसात अक्षरश: पुस्तकेच खात होतो. आम्हांला झोपतानाही पुस्तक लागायचे. पुस्तकांशी घट्ट मैत्री झाली होती. 'शब्द' हीच आमची दोघांची भाषा. शिष्यवृत्तीतील या यशाने माझ्यासह विद्यार्थी, पालक यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले. आयुष्यात जे काही सुखाचे क्षण पाहिले त्यात हा परमोच्च आनंदी क्षण.

### यशाचे गमक :

हे यश माझे एकट्याचे नसून यामागे अनेक हात अप्रत्यक्षरीत्या कार्यरत होते. त्यांचा देखील या यशामध्ये मोठा वाटा आहे. शिक्षण विभागाकडून आयोजित सराव चाचण्या या यशासाठी लाभदायक ठरल्या. माझ्या विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम, अधिकारी वर्गाची प्रेरणा, मुख्याध्यापक व सहकारी शिक्षकांचे प्रोत्साहन आणि पालकांचे सहकार्य याचे फलित म्हणजे हे शिष्यवृत्तीतील देदीप्यमान यश होय!

माझे आणि 'शिष्यवृत्ती'चे नाते जडले ते कायमचेच. माझ्या आयुष्यातील परमोच्च आनंदाचा क्षण केवळ शिष्यवृत्तीमुळेच मला लाभला. शिष्यवृत्तीमुळे माझ्या वाट्याला आलेल्या अनेक अनुभवांनी माझे आयुष्य माझ्या नकळत घडत गेले. शिष्यवृत्तीने मला भरभरून यश दिले; इतके की, घ्यायला माझी ओंजळ कमी पडली.

◈◈◈

---

**(पृष्ठ क्र. ३८ वरून)**

महाबळेश्वर तालुक्यात शिक्षणमहोत्सव पार पडला. त्यामध्ये आमच्या शाळेतील दोन बालकवयित्रींना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र मिळाले. त्यामुळे शाळेचे नाव तालुक्यात झाले.

सदरहू उपक्रम शाळेत राबविल्यामुळे मुलांमध्ये पुढील कौशल्ये विकसित झाली.

१) शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या शब्दसंपत्तीत वाढ झाली.
२) मुलांना यमक जुळणारे शब्द शोधण्याची सवय लागली.
३) मुलांचा भावनिक विकास झाला.
४) मुले आपल्या लेखनात अलंकारिक शब्दांचा वापर करू लागली.
५) प्रत्येक विषयाला कवितेचा स्पर्श झाल्याने मुलांना विषय सोपे वाटू लागले.
६) मुलांमध्ये विचार करण्याची वृत्ती वाढीस लागली.
७) मुलांमध्ये सर्जनशीलता हा गुण वाढीस लागला.
८) मुलांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण झाली.

अशाप्रकारे सर्व शिक्षकांनी प्रत्येक शाळेमध्ये हा उपक्रम राबविल्यास निश्चितच मुलांमध्ये विविध गुणांचा विकास होईल.

◈◈◈

**२६ जुलै : अमली पदार्थ विरोधी दिन.**

## प्रिय संपादक ....

माहे जून २०20 चा 'जीवन शिक्षण' अंक वाचला, खूपच भावला. एक चुतरस्र अंक वाचल्याचे आत्मिक समाधान लाभले. अंकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ अतिशय समर्पक असून; मलपृष्ठावरील 'शाळा भरेल काय' या कवितेत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर, शाळेपासून व मित्रांपासून दूर राहिलेल्या व दैनंदिन जीवनाची घडी विस्कटलेल्या, एका मुलाच्या भावना प्रभावीपणे मांडण्याचा मनोहर मोहरे सरांचा प्रामाणिक प्रयत्न कौतुकास्पद आहे. तसेच लवकरात लवकर डॉक्टरांनी लस शोधून कोरोनाला घालवावे व गुरुजी आणि बाईंनी लवकर शाळा भरवावी, ही मुलाच्या अंतर्मनातून आलेली हाक बरेच काही सांगून जाते.

त्याचबरोबर 'जबाबदार पालकत्व' हा डॉ. ह. ना. जगताप यांचा लेख, पालक आणि पाल्य यांच्यात आंतरक्रिया घडून येण्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे. श्री. एन. बी. मांडलीक सरांची फक्त दोन मिनिटांत मास्क तयार करण्याची सोपी पद्धत अतिशय उपयुक्त असून, सद्य:स्थितीत गरजेची आहे.

त्याचबरोबर अंकातील लोकशिक्षक सानेगुरुजी, दिशा गणित शिक्षणाची, वाचनाचा राजमार्ग व अन्य सर्वच लेख माहितीपूर्ण व वाचनीय आहेत म्हणूनच जून २०२० चा 'जीवन शिक्षण' अंक एक चतुरस्र अंक आहे असे मला वाटते. 'जीवन शिक्षण' अंकाच्या भावी वाटचालीसाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा.

**श्री. ईश्वर उखा पाटील**

जि. प. केंद्र शाळा मोऱ्हांडा, ता. मोखाडा, जि. पालघर

एप्रिल २०२० च्या अंकाचे मुखपृष्ठ अतिशय आकर्षक झाल्यामुळे अंक हवाहवासा वाटतो. डॉ. बबन जोगदंड व रावसाहेब शितोळे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रसंगांची समर्पकपणे मांडणी केलेली आहे. त्यामुळे ते लेख आम्हां शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहेत. २२ एप्रिल जागतिक वसुंधरा दिवसाची रंगनाथ नाईकडे यांनी दिलेली माहिती खूपच छान आहे. आज खऱ्या अर्थाने वसुंधरेला आनंद होत असेल की, तिची कोरोना महामारीच्या लॉकडाऊनमुळे का होईना, प्रदूषणापासून पूर्णपणे मुक्तता झालेली आहे. स्वच्छ शुद्ध हवेचा आपण सारे मनमुराद आनंद घेत आहोत. प्रदूषणाची पातळी खूपच कमी झालेली आहे. शुभांगिनी वासनिक यांनी कोरोनास लिहिलेल्या पत्राची जनजागृती करण्यास मदत होणार आहे. 'बोलीभाषेकडून प्रमाणित भाषेकडे नेणारी शाळा' हा लेख ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी उपयुक्त आहे.

इतर शैक्षणिक लेख शाळा, शिक्षक, विद्यार्थी, समाज, पालक यांसाठी पथदर्शक म्हणून उपयुक्त आहेत. सुदृढ शरीरात प्रसन्न मन असते असे ज्योती आंबेकर यांच्या लेखनावरून दिसून येते. प्रत्येकाने आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे.

यापुढे उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत मे महिन्याचा अंक फक्त विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या साहित्यातून प्रकाशित व्हावा. त्यातून त्यांच्या भावविश्वाचा ठाव घेणाऱ्या कथा, कविता, गोष्टी, अनुभव व चित्रे प्रकाशित केल्यास 'जीवन शिक्षण' अंकाच्या माध्यमातून भविष्यातील लेखक, कवी व चित्रकार निर्माण होण्यास वाव मिळेल असे वाटते. पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

**श्री. साहेबराव हरी गुंजाळ**

जि. प. प्राथ. शाळा वासाळी. पो. त्र्यंबक, जि. नाशिक.



२७ जुलै : डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम स्मृतिदिन (२०१५)



## प्रत्यक्ष प्रयोगातून विज्ञान व गणिताचे मजेदार शिक्षण


# हवेचे प्रसरण व आकुंचन

(Expansion and Contraction of Air)






साहित्य : कार्डबोर्ड (जाड पुठ्ठा), फुगा, मडक्यातील/माठातील किंवा बर्फ असलेले थंड पाणी, गरम पाणी, कात्री.




कार्डबोर्डच्या (पुठ्ठ्याच्या) मध्यभागी सुमारे ३-४ इंचाचे एक वर्तुळ काढून ते कात्रीने कापा.




या कापलेल्या वर्तुळाकृती भागात बरोबर बसेल एवढा फुगा फुगवा आणि त्या जागी बसवून फुग्याचे आकारमान व कापलेल्या वर्तुळाचा व्यास बरोबर असतील याची खात्री करा.




दुसऱ्या बाजूने पहा, हा फुगा वर्तुळात तंतोतंत बसलेला आहे.




आता हा फुगा एका रिकाम्या भांड्यात ठेवा. मोठ्या माणसांच्या किंवा शिक्षकांच्या मदतीने या फुग्यावर गरम पाणी ओता.




आता हा फुगा पुन्हा पुठ्ठ्यावर कापलेल्या वर्तुळाकृती भागातून आरपार घालविण्याचा प्रयत्न करा. फुगा आरपार का जाऊ शकत नाही?




फुगा काढून परत रिकाम्या भांड्यात ठेवा. आता त्यावर माठातील किंवा बर्फाचे थंडगार पाणी ओता.




परत पुठ्ठ्यावर कापलेल्या वर्तुळाकृती भागातून घालविण्याचा प्रयत्न करा. फुगा सहज आरपार का जाऊ शकतो, कारण शोधा?

वैज्ञानिक / शास्त्रीय कारण : फुग्यात असलेल्या हवेच्या प्रसरणामुळे व आकुंचनामुळे फुग्याचे आकारमान बदलते. फुग्यावर गरम पाणी ओतल्यावर, गरम पाण्यामुळे फुग्यातील हवेचे तापमान वाढून हवा प्रसरण पावते व फुगा आकारमानाने मोठा होतो म्हणून पुठ्ठ्याच्या वर्तुळातून जात नाही. आता याच फुग्यावर थंड पाणी ओतल्यावर थंड पाण्यामुळे फुग्यातील हवेचे तापमान कमी होऊन हवा आकुंचन पावते व फुगा आकारमानाने लहान होतो म्हणून तो वर्तुळातून सहज आरपार जातो. बदललेल्या तापमानामुळे होणारे 'हवेचे प्रसरण व आकुंचन' हा प्रयोग करताना तुम्हांला नक्कीच मजा वाटली असेल.

निर्मिती : **सायन्स ॲक्टिव्हिटी सेंटर, आयसर, पुणे.**


'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. दिनकर पाटील यांनी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगाव बु.।।, सिंहगड रोड, पुणे-४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

Date of Publication 3 July 2020
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th of July 2020
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/57
Post Registration No.: PCW/063/2018-2020
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

## जीवन शिक्षण प्रकाशन विभाग

## विक्रीसाठी प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत रुपये | पोस्टेज खर्च |
|---|---|---|---|
| १. | अधिकारी कर्मचारी मार्गदर्शिका | रु. १३०/- | ३०/- |
| २. | माझा वेगळा उपक्रम | रु. ४०/- | ३०/- |
| ३. | आठवणीतील शाळा | रु. ७०/- | ३०/- |
| ४. | राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ | रु. ९०/- | ३०/- |
| ५. | टर्निंग पॉईंट | रु. ५०/- | २५/- |
| ६. | प्रश्नमंजूषा | रु. ४०/- | ३०/- |
| ७. | गीतावली पुस्तक | रु. ७०/- | ३०/- |
| ८. | गीतावली सी. डी. | रु. ५०/- | -- |
| ९. | १ ते ८ अभ्यासक्रम सी. डी. | रु. ५०/- | -- |
| १०. | हितगुज | रु. ४०/- | २५/- |
| ११. | भाषिक खेळ | रु. १००/- | ३०/- |
| १२. | आर. टी. ई. २००९ | रु. ६०/- | ३०/- |
| १३. | जागर जाणिवांचा | रु. ४०/- | २५/- |

वरील पुस्तके प्रकाशन विभागाकडे उपलब्ध आहेत.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

**प्रति** ______________________